# माणूस

साप्ताहिक

२९ ऑक्टोबर १९६६

चाळीस पैसे





मला साऱ्या हिंदुस्थानातले रेल्वेकामगार संघटित करावयाचे आहेत. — जॉर्ज फर्नांडिस

लवकरच प्रकाशित होत आहे

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

: लेखक :

रा. म. शास्त्री





## एक समग्र साप्ताहिक

वर्ष – सहावे
अंक : सतरावा
किंमत : चाळीस पैसे
वार्षिक वर्गणी : वीस रुपये

**संपादक**

श्री. ग. माजगावकर

**संपादक मंडळ**

अ. मा. साधू
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**व्यवस्था विभाग**

अ. वा. गंधे
अ. वि. गणपत्ये

पत्ता – ४१९ नारायण, पुणे २.

दूरध्वनी – ५७३५९


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# पत्रमैत्री

**स. न.**


आमचे घरी 'माणूस' मासिक सुरुवातीपासून नियमित येत आहे. आमच्या घरातील सर्वजण अंक पूर्ण वाचतात व पूर्ण अंक सर्वांनाच आवडतो. मीही उत्सुकतेने 'माणूस' हातात घेते. परंतु मी फारच थोडा भाग समजावून घेऊ शकते. बाकी सर्व माझ्या डोक्यावरून जाऊन मला काहीच कळत नाही. आणि उत्सुकतेने उचललेला 'माणूस' मी रागाने भिरकावून देते. तरी आपणांस माझी विनंती आहे की आपण 'माणूस' मध्ये बालवाचकांसाठी काहीतरी सदर ठेवावे. त्यामुळ आपल्या 'माणूस'ला खचितच जास्त आकर्षकपणा येईल व आम्हांला (बालवाचकांना) 'माणूस' वाचनाची गोडी वाढेल. **–उत्तरा ना. दीक्षित, वर्धा.**

**स. न.**

खूप दिवसांपासूनचा आपले अभिनंदन आणि 'माणूस'ला अखंड कीर्ती मिळावी म्हणून सदिच्छा पत्ररूपाने प्रकट करण्याचा मानस आज प्रत्यक्षात आला. सांगलीच्या श्री. बेकनाळकर यांच्याकडे एकदा तुमचा अंक पाहिला. आणि त्याचा छंद अविश्रांत लागला. 'माणूस'मधील मुखपृष्ठापासून शेवटपर्यंत परवडणाऱ्या चाळीस पैशाच्या दरात खूप ज्ञान मिळते.

आपल्या अंकातील श्री. स. का. पाटील यांची माहिती तर अनेक पक्ष संबंधित प्रमुख लोकांनी मनःपूर्वक वाचली एवढेच नव्हे तर त्यांनी मजकडील जुने अंक नेऊन वाचले. जर आठवड्याचा अंक वाचावयास मिळाला नाही तर चुकल्यासारखे होते. पुणे येथे गेल्याबरोबर पहिल्यांदा 'माणूस' खरेदी.

**– बी. पी. अकोवाटे, खेड.**



## □ गाऊ त्यांना आरती !

कुठेही दंगल झाली, की त्या दंगलीत जे लोक बसेस्, गाड्या, वाहने यांवर दगडफेक करतात, पोलीस कॉन्स्टेबलसला बडवतात, दुकाने फोडतात व लुटतात, त्या सर्वांना हात असतात. हात असल्याखेरीज या गोष्टी करणेच शक्य नाही. या माणसांना कसे 'हाताळावे' या चिंतेने गृहमंत्री नंदा त्रस्त आहेत. आतापर्यन्त विद्यार्थीवर्गाने मोठ्या प्रमाणावर दंगली केल्या नव्हत्या. आता विद्यार्थ्यांनीही हातातील पाटी दप्तरे टाकून हातांत दगड घेतले आहेत. आपल्या हातून या पवित्र दंगली शमविण्याचे कार्य होईल की नाही, यासंबंधी सल्ला विचारण्याकरता राजकारणातल्या असंख्य ज्योतिष्यांची सध्या दिल्लीत ही गर्दी उसळलेली आहे. याशिवाय सर्व राज्यांचे मुख्यमंत्री, सव राज्यांचे गृहमंत्री, सर्व राज्यांतले पोलीस कमिशनर्स, सर्व राज्यांचे गुप्त पोलीस प्रमुख, सर्व राज्यांचे विभागीय कमिशनर्स, सर्व राज्यांतले समाजसेवक, सर्व राज्यांतले साधू संन्यासी, निवृत्त न्यायमूर्ती, सेनादलांतले प्रमुख अधिकारी, असे किती लोक सांगावेत ? 'चलो दिल्ली' म्हणत जो तो नंदांच्या मठाकडे धावतो आहे.

साहजिकच आहे ! महात्मा गांधींच्या जयंतीच्या दिवशी सगळ्या विद्यार्थ्यांना डॉ. राधाकृष्णन् यांनी सांगितले–

" इफ् ओन्‌ली दे एनडेव्हर टू रीड दी उपनिषदाझ्, दी रामायण, दी महाभारत, पंचतंत्र, दी स्टुडन्टस् विल् नो हाऊ सायन्टिफिक, हाऊ डेमोक्रॅटिक, हाऊ हारमोनियस्, हाऊ सिग्निफिकन्ट, दि नेशन्स रिलिजन इज ! कोऑर्डिनेशन ऑफ डिझायर्स इज धर्म. डिसइंटिग्रेशन ऑफ डिझायर्स इज अधर्म... "

बापरे ! म्हणजे उपनिषदे, रामायण, महाभारत, पंचतंत्र ही वाचली तर विद्यार्थ्यांना हे कळणार की आपला राष्ट्रधर्म (म्हणजे कोणता ?) हा किती सशास्त्रीय, किती लोकशाहीवादी, किती संतुलक, किती अचूक आहे. युनिव्हर्सिटीला आग का लावू नये, शाळेवर दगड का मारू नयेत, मुख्याध्यापकांना का बदडू नये, बसेस्‌वर दगड का मारू नयेत हे समजण्यासाठी – उपनिषदं वाचायला लागत असतील तर विद्यार्थी हे करणारच ! राष्ट्रपतींचे ठीक आहे. सकाळी एकदा मंत्रिमंडळातल्या कुणाचा वाढदिवस असेल त्याला कडकडून भेटले, इंदिराबाई कुठे जगात शतपावली करून परत येणार असल्या, तर त्यांचे विमानतळावर स्वागत केले, तरी

दिवसाचा बराचसा वेळ त्यांना उपनिषदे, रामायण, पंचतंत्र वगैरे वाचायला मोकळा मिळू शकतो. विद्यार्थ्यांची गोष्ट निराळी. शाळेत काही आपल्या या प्राचीन का काय धर्माचे काही बरे कानांवर जाईल तर ती सोय नाही ! शिक्षणाचे माध्यम काय असावे, हिन्दी शिकलेच पाहिजे का, या प्रश्नावर घोळ असल्याने वर्गात विद्यार्थ्यांचे लक्ष लागत नाही. शिवाय झाडे लावा दिन, सूतकताई, यु. नो. दिन, शिक्षकदिन, गांधी जयंती, नेहरू जयन्ती, स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, या सर्व दिवशी शाळेत आणलेला गावठी, प्रांतिक व राष्ट्रीय पातळीवरचा पुढारी इशारे देत सांगत असतो–

" देश संकटात आहे. चीन व पाकिस्तान आपल्या गळ्याला नखे लावून आहेत. महागाई वाढत आहे. अवर्षणाची शक्यता आहे. व्हिटनाम युद्धामुळे अवघा भारत अस्वस्थ आहे. अवमूल्यन झाले आहे. सीमा प्रश्न उग्र आहे. आपली चौथी योजना सुरू होत आहे..."

अशी सारखी संकटांवर संकटे असताना विद्यार्थ्यांचे बाहू स्फुरण नाही पावणार ?

दंगल करणाऱ्यांचे हात पकडून त्या विद्यार्थ्यांच्या चार कानफाटांत मारणारा हिंसक मार्ग नंदांना नको आहे. हे करायला काय अक्कल लागते काय ? पोलिसांना नंदांनी सांगितले –

" विद्यार्थ्यांचे हात दगड मारीत नाहीत तर त्यांची मने दगड मारतात !"

मानसोपचार तज्ज्ञांना नंदांनी पाचारण केले आहे. सकस चारा घालून गाईचे दूध अधिक काढायला नवा प्रयोग म्हणत नाहीत. संगीताच्या तबकड्या वाजवून एका वेळी पंचवीस–तीस लिटर दूध काढण्याचा प्रयोग अभिनव असतो. असा तर्क आहे की, अभ्यासात जे काही ज्ञानकण अजून शिल्लक असतात त्यांचा त्रास विद्यार्थ्यांना होत असावा. हे ज्ञानकण ताबडतोब काढून टाकण्यात यावेत.

न कशीदेसे चलती है । न दोहेसे । का रे सल्तनत । लोहेसे चलती है ।

हा हिंसक विचार नंदांना मान्य नाही. रागदारी गाऊन, सुभाषिते गाऊन राज्यकारभार चालत नाही, वगैरे गोष्टी नंदांना कुणी सांगितल्या तर ते ऐकणार नाहीत ! शांततेच्या रागदाऱ्या गात पोलिस वरिष्ठ अधिकारी रस्त्यांतून लवकरच दिसू लागतील ! पोलीस बॅन्ड विद्यार्थ्यांना शाळेत नेण्या-आणण्याकरता रस्त्या रस्त्यांतून गाणी बडवीत जाईल–" गोविंदा आला रे आला ! जरा मटकी संभाल ब्रिजबाला –!"

किती सुंदर चित्र ! गोपाळ, सीता, यास्मिन, सुरेश व अहमद पाट्यादप्तरे घेऊन शाळेला चालली आहेत. पुढे पोलीस बॅन्ड आहे. सिने संगिताचे सूर वातावरण प्रसन्न करीत आहेत. शाळेतही पहिला तास फोकडान्सचा आहे. मास्तर फेर धरून लोकनृत्य करीत आहेत. विद्यार्थ्यांनी ताल धरला आहे. पुढचा तास कुस्त्यांचा आहे ! त्यानंतर राष्ट्रपतींची टेप रेकॉर्ड ... जनगणमन वगैरे वगैरे !

## □ ग्रामीण साक्षात्कार

श्री. कुंभराम आर्य ! पूर्वी बिकानेरमध्य पोलिस होते. स्वातंत्र्य आले. राजस्थान राज्य स्थापन झाले आणि कुंभराम सध्या महसूल मंत्री आहेत ! नुकतीच राजस्थानात मध्यवर्ती सरकारच्या नोकरांच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक जयपूरला झाली. या मेळाव्यापुढे भाषण करण्याकरता कुंभरामांना बोलावले. मध्यवर्ती सरकारच्या गळचात मागण्यांची रुंडमाला अडकवण्यासाठी बोलावल्यामुळे राज्य-सरकारच्या मंत्र्यांना असे अवसान चढले, की विचारू नका ! बरेच दिवसांनी एकदम खरे बोलू लागले ! कुंभरामांनी सांगितले—

' लोकशाही राज्यातले सरकार हे हिमपर्वतासारखे असते. तुम्ही त्याला जरा आच लावलीत की लागले वितळायला ! "

थोडीशी होरपळ निर्माण करण्याचा सल्ला दिल्यानंतर महसूलमंत्री पुढे तर फारच खरे बोलले. त्यांनी उदाहरण दिले ते अगदी उसाचे ! ते म्हणाले—

" लोकशाहीतले सरकार हे एखाद्या उत्तम ऊसमळचासारखे असते ! ज्याच्या दातात ताकद असेल त्याने या उसाच्या कांडयांना चावा घ्यावा. जसा दातांचा जोर असेल तसा मधुरस चाखता येईल. दातांतच जोर नसला तर मात्र हे उसाचे शेत त्याला डोळचांपुढे नकोसे होईल ! "

लोकशाहीचा हा ग्रामीण साक्षात्कार झालेले हे महसूल मंत्री हळहळू गृहमंत्री व कालांतराने राजस्थानचे मुख्यमंत्री होतील, अशी आशा करायला हरकत नाही !

## □ इंदिरा आणि अन्सारी

अब्दुल कयुम अन्सारी ! राष्ट्रीय मुसलमान व बिहारचे आरोग्यमंत्री यांनी नुकतीच काँग्रेसमधल्या राष्ट्रीय मुसलमानांच्या शिष्टमंडळाचे प्रमुख प्रतिनिधी म्हणून इंदिराजींची भेट घेतली. त्यांनी मागणी केली— " लोकसंख्येच्या प्रमाणात मुसलमानांना निवडणुकीत तिकिटे मिळावी. "

आता या मागणीत अन्यायकारक काही आहे का ? राष्ट्रीय मुसलमानांना, लोकसंख्येच्या प्रमाणात काँग्रेसची तिकिटे हवी आहेत. इकडे हे राष्ट्रीय मुसलमान असे प्रेमळ घरणे घरून बसले आहेत, तो तिकडे मध्यवर्ती सरकारात मंत्री करून चांगला ' कन्फर्म ' केलेला राष्ट्रीय मुसलमान प्रा. हुमायुन कबीर, काँग्रेसवर दुगाण्या झाडीत काँग्रेस सोडून गेला. ' काँग्रेस जातीय आहे, अल्पसंख्याकांचा छळ करते, लाचलुचपतीने बुजबुजली आहे, भांडवलदारांची बटिक आहे,' अशा नाना शिव्या देत प्रा. कबीर काँग्रेस सोडून गेले. आता आहेत ते राष्ट्रीय मुसलमान निवडणुकीत इंदिराजींना व कामराजांना सांभाळायला नकोत ?

पण मुंबईच्या ' टाईम्स ' पत्राने यावर स्फुट लिहिले. उघड खेद प्रदर्शित केला.

" निदान अन्सारी अशी काही जातीय मागणी करतील अशी अपेक्षा नव्हती ! "

परंतु ही मागणी मुळीच जातीय नाहीच. मागणी नीट समजून न घेता अन्सारींना नावे ठेवणे चांगले नाही. इंदिराजी—अन्सारी सुखसंवाद काय झाला असेल याचा तर्क आपण करू—

" राष्ट्रीय मुसलमानांची मागणी आहे की लोकसंख्येच्या प्रमाणात आपल्याला काँग्रेसची तिकिटे मिळावी. " —अन्सारी

" तुम्ही फक्त राष्ट्रीय मुसलमानांचेच प्रतिनिधी आहात ना ?—" इंदिराजी.

" देवीजी ! काय हे विचारणे ?—" अन्सारी.

" आपल्या देशात राष्ट्रीय मुसलमानांची जी संख्या आहे त्यापेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात तुम्हांला जागा दिल्या गेल्या आहेत. तुमची सध्याची लोकसंख्या किती आहे ? " इंदिराजी.

" पाच कोटी ! "

" मी सगळ्या मुसलमानांना प्रतिनिधित्व द्यायला बांधलेली नाही. तुम्हीही त्यांचे प्रतिनिधी नाही. ' राष्ट्रीय ' मुसलमानांची लोकसंख्या किती ? मी त्या सगळ्यांना तिकिटे देणार आहे. " इंदिराजी.

यानंतर अन्सारी आणि मंडळी ' या खुदा ' म्हणत पसार झाली.

## □ संशोधन !

' जनसंघा 'त संशोधकांचा भरणा पहिल्यापासूनच फार ! राज्यावर आल्यावर त्यांना ' अणुबॉम्ब ' वगैरे करावयाचा असल्याने पक्षात आतापासूनच संशोधकांना जास्त जास्त वाव देण्यात येत आहे ! कम्युनिस्ट कसा असतो, काय करतो व कुठे राहतो या गहन प्रश्नावर सध्या पक्षातले प्राथमिक संशोधक आपले प्रबंध अधूनमधून वाचीत असतात. एखादा सगोत्र माणूस काँग्रेसमध्ये गेला तर तो कम्युनिस्ट समजावा, असा प्राथमिक शोध स. गो. बर्वे यांच्या वर्तनावरून मागील निवडणुकीतील ' जनसंघा 'ने लावला होता. पाच वर्षांनंतर पुन: आता जनसंघाचे शोध लागू लागले आहेत. विद्यार्थ्यांच्या दंगलीमागे कम्युनिस्टांचा 'हात' 'दक्ष' राहून पाहणाऱ्या प्रा. बलराज मधोक यांनी जाहीर केले आहे — " कामराज कम्युनिस्ट आहेत ! "

अरे तिच्या ! कामराज कम्युनिस्ट म्हणजे आटोपलेच की ! तरीच बरं का नुकतेच ते रशिया, हंगेरी, पूर्व जर्मनी या देशांचा दौरा करून आले ! त्यांचे शरीरही माओसारखे बाळसेदार आहे. माओला पुढून टक्कल असले तर यांना मागून आहे ! कम्युनिस्ट म्हटला की तो केस पिंजारलेला कामगार भाई या कल्पनेला प्रा. मधोक यांनी चांगलाच धक्का दिला आहे. संशोधन जारी ठेवावे !

—ग्यानबा

● ● ●

# जॉ र्ज सा ब

## आमच्या प्रतिनिधीकडून

मुंबईला गिरगावातल्या बाँबे लेबर युनियनच्या कचेरीमध्ये दुसऱ्या मजल्यावर श्री. जॉर्ज फर्नांडीस याची बसण्याची खोली आहे. खोलीबाहेर सतत वेगवेगळ्या पेशांचे अनेक कामगार हातात कागदपत्रे घेऊन आपल्या कुठल्यातरी गाऱ्हाण्यांची 'जॉर्जसाब' जवळ दाद लावून घेण्यासाठी ओळीत बसलेले असतात. खोलीत जॉर्ज फर्नांडीस यांचा कामाचा सपाटा चालू असतो. अमुक कारखानदाराला नोटीस दे, तमक्या कंपनीतल्या कामगारांवर झालेल्या अन्यायाकडे मालकाचे लक्ष वेध अशा तऱ्हेची पत्रे लिहिणे चालू असते. वेगवेगळ्या पत्रांवर भराभर सह्या होत असतात. एकीकडे आत येणाऱ्यांशी बोलणे चालू असते.

खोलीत जॉर्ज फर्नांडीस यांच्या बसण्याच्या खुर्चीवर डाव्या बाजूच्या स्टुलावर एका बारीक सळईवर एक लहानसा तिरंगा ध्वज डौलाने फडकत असतो. भिंतीवर चारी बाजूंना मुंबईचे, महाराष्ट्राचे, भारताचे आणि जगाचे नकाशे टांगून ठेवलेले असतात.

उकाडा असह्य होत असतो म्हणून सहजपणे फर्नांडीससाहेब आपल्या अंगातला मॅनीला काढून खुर्चीवर लटकावून ठेवतात आणि तेवढ्याच सहजपणे पण पूर्ण आत्मविश्वासाने मला सांगतात –

"मी स. का. पाटलांविरुद्ध नुसताच उभा राहणार नाही, तर त्यांना पाडणार आहे. त्यांचा दणदणीत पराभव करणार आहे."

"आपण लोकसभेसाठी मुंबईतून पाटलांविरुद्ध उभे राहणार हे खरं का ?" या माझ्या प्रश्नाला श्री. फर्नांडीस यांचे हे दणकेबाज उत्तर.

कामगार नेते जॉर्ज फर्नांडीस यांचं सारं जीवनच धडाडीचं आणि दणकेबाज आहे. अवघ्या पंधरा वर्षांपूर्वी त्यांना मुंबईत कुणी विचारीत नव्हतं. एकावेळच्या जेवणाची त्यांना फिकीर पडायची. आज मुंबईच्या जीवनाच्या बऱ्याच नाड्या त्यांच्या हातात आहेत. मुंबईच्या कामगारांमध्ये 'जॉर्जसाब' हा परवलीचा शब्द बनला आहे. त्यांच्या एका हाकेसरशी सारे मुंबईचे लक्षावधी कामगार धावून येतात. आणि आता ते कैक वर्षांपासून मुंबईत घट्ट पाय रोवून बसलेल्या एका बलाढ्य राजकीय पुढाऱ्याला आव्हान देत आहेत !

### पाटीलही पडू शकतात

"लोकांची जी समजूत आहे की, मुंबईतल्या मतदारांची मतं विकत घेता येतात ती चुकीची आहे. आणि अशी समजूत करून घेऊन हे लोक मुंबईतल्या

# ... फूटपाथ ते कामगार मैदान ...

मतदारांवर अन्याय करतात," श्री. फर्नांडीस मला आवेशाने म्हणाले. " दक्षिण मुंबईत साडेचार लाख मतदार आहेत. त्या सर्वांना माझं राजकारण पसंत नसेल. पण त्या सर्वांना कॉंग्रेसचाच उमेदवार हवा आहे असंही नाही. याच मतदार-संघातून मी निवडून येऊन दाखवून देईन-की हे मतदार प्रामाणिक आहेत."

लोकसभेसाठी उभे राहण्याची 'हौस' नाही असे फर्नांडीस सांगतात. "हौस असती तर दुसऱ्या सोप्या मतदारसंघातून उभा राहिलो असतो. तसा मला अनेकांनी आग्रहही केला." ते म्हणतात, "माझा मुख्य उद्देश पाटील मुंबईत पडूच शकत नाहीत हा भ्रम दूर करण्याचा. मुंबईत निवडणूक थैलीशाहीवर, गुंडगिरीवर चालते हा गैरसमज दूर करण्याचा, आणि माझी खात्री आहे, की मी पाटलांचा जबरदस्त पराभव करीन."

एवढ्या घडाडीचा हा जहाल कामगार नेता कॅथॉलिक प्रीस्ट बनणार होता. हे कुणाला ऐकूनही खरं वाटणार नाही.

जॉर्ज फर्नांडीस यांचं कुटुंबच धार्मिक होतं. मंगलोरला एका मध्यमवर्गीय रोमन कॅथॉलिक कुटुंबात १९३० च्या ३ जूनला जॉर्जचा जन्म झाला. पाच भावांपैकी जॉर्ज सगळ्यात मोठा. त्याचे वडील विमा एजंट होते. सोळाव्या वर्षी मॅट्रिक झाल्यावर धर्मगुरू बनण्यासाठी त्याच्या वडिलांनी त्याला सरळ बंगलोरच्या एका कॅथॉलिक सेमीनरीत घातलं.

दीड-दोन वर्षे जॉर्ज फर्नांडीस यांनी सेमीनरीमध्ये लॅटीन आणि फिलॉसॉफी या विषयांत चांगलीच प्रगती केली. असंच पुढे चालू राहिलं असतं तर आज कुठल्यातरी चर्चमध्ये ते बायबलची प्रवचनं करीत राहिले असते. पण त्यांची चिकित्सक बुद्धी त्यांना स्वस्थ बसू देणार नव्हती.

थोड्याच दिवसांत त्यांना कंटाळा आला. अभ्यासक्रमाचा नव्हे तर सेमीनरीमधल्या धर्मगुरूंच्या ढोंगीपणाची, सेमीनरीविषयी, सेमीनरीतल्या शिक्षणाविषयी त्यांच्या बऱ्याच अपेक्षा होत्या. त्या अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत. त्यांना चीड आली— " सेमीनरीत इतर बऱ्याच चीड आणणाऱ्या गोष्टी होत्या."

" ख्रिश्चन धर्मशास्त्राप्रमाणे प्रीस्ट (धर्मगुरू) म्हणजे ' अल्तेर क्रिस्तोस ' दुसरा ख्रिस्त् श्री. फर्नांडीस म्हणाले, " पण बऱ्याचशा धर्मगुरूंच्या जीवनाकडे पाहिलं की नरक स्वर्गापासून जेवढा दूर आहे, तेवढे हे धर्मगुरू ख्रिस्तापासून दूर आहेत, असं वाटतं. " (But it you look at the life of priests, most of the time they are as far removed from Christ as hell is from heaven.)

"दुसऱ्याला मोक्षाच्या गप्पा सांगणाऱ्यांनी तरी स्वत: काही गोष्टी पाळाव्यात असं वाटतं. पण प्रत्येक गोष्ट चिकित्सक बुद्धीने निकषाला घासून पाहणाऱ्या माझ्या तरुण मनाच्या वाट्याला विफलताच आली आणि हळू हळू मी सेमीनरीच्या शिक्षणातून अंग काढून घेतलं." श्री. फर्नांडीस यांनी मला सांगितलं. सेमीनरीचं शिक्षण त्यांनी अपूर्णच सोडलं असलं तरी धर्मावरची श्रद्धा त्यांनी सोडली नाही.

सेमीनरीमध्ये असताना श्री. फर्नांडीस यांनी पियानोसारखी काही वाद्ये वाजविण्याचे शिक्षण घेतले. उत्तम वाद्यवादक म्हणून आणि उत्तम प्रार्थनागायक म्हणून त्यांनी सेमीनरीत नाव कमावलं होतं.

## मंगलोरातील कामगार कार्य

सेमीनरी सोडल्यावर श्री. फर्नांडीस यांनी मंगलोरला 'युवक' नावाचं एक मासिक सुरू केलं. श्री. फर्नांडीस यांची मातृभाषा कोकणी. कानडी लिपीतील कोकणी भाषेमध्ये त्यांनी हे मासिक सुरू केलं. कानडी लिपीतील कोकणी वाचणारे फक्त रोमन कॅथॉलिकच. त्यांच्यामध्येच या मासिकाचा प्रसार होता. फर्नांडीस त्यामध्ये धर्म आणि राजकारण या विषयांवर निर्भीडपणे चर्चा करीत. ती अर्थातच कर्मठ कॅथॉलिकांना पसंत पडत नसे. शेवटी परमेश्वराच्या अस्तित्वाच्या सत्यासत्यतेवरच त्याने खळबळजनक चर्चा सुरू केली तेव्हा खुद्द चर्चनेच त्या मासिकाविरुद्ध प्रचार सुरू केला आणि ख्रिश्चनांना ते मासिक वाचण्यास बंदी केली. ते अर्थातच त्यामुळे बंद पडलं.

या साऱ्या चळवळीपणाबद्दल जॉर्ज फर्नांडीस यांना आपल्या घरच्या लोकांच्या सहानुभूतीला मुकावं लागलं.

याच सुमाराला मुंबई शहरातून हद्दपार झालेले कामगार नेते श्री. डिमेलो हे मंगलोरमध्ये आले होते. १९४९ मध्ये त्यांचा आणि जॉर्ज फर्नांडीस यांचा परिचय झाला. आणि त्यांच्या परिचयामुळेच ते समाजवादी चळवळीत ओढले गेले. "समाजवादी पक्षात जाऊन सर्व समाजवाद्यांनी खूप भांडणं केली," फर्नांडीस सांगतात.

मंगलोर शहरातल्या मोटार कामगारांची आणि हॉटेल कामगारांची स्थिती त्या वेळी अतिशय दयनीय होती. या दोन्हीही धंद्यांतील कामगारांच्या डिमेलो आणि फर्नांडीस यांनी संघटना उभारल्या. याच वेळी जॉर्ज फर्नांडीस यांना स्वत:चं क्षेत्र सापडलं. त्यांचं संघटनकौशल्य याच वेळी दिसून आलं. जुलै १९५० मध्ये डिमेलो आणि फर्नांडीस यांनी मंगलोरचा मोटर कामगारांचा संप घडवून आणला आणि त्यामध्ये त्यांना प्रचंड मार बसला.

संपात मार बसला तरी फर्नांडीस यांनी मंगलोरच्या कामगारांत खूप लोकप्रियता मिळवली होती. त्यांचं वय अवघं वीस वर्षांचं होतं. पुढे शिकावं ही इच्छा होती. घरी थारा नव्हता. ते ज्या हॉटेल कामगारांमध्ये काम करीत त्यांनी पैसा पैसा वर्गणी गोळा करून २५ रुपये जमा केले आणि कायद्याच्या शिक्षणासाठी श्री. जॉर्ज फर्नांडीस यांना मुंबईला पाठवलं.

## फूटपाथवरून कामगार मैदानावर

फर्नांडीस जेव्हा मुंबईत बोरीबंदरवर उतरले तेव्हा त्यांच्या खिशात फक्त आठ आणे होते. चणे फुटाणे खाऊन त्यावर पाणी पी, कधी पडेल ती हमाली कामे करून खाण्यापुरते पैसे मिळव असा दीड महिना त्यांनी मुंबईत काढला. हार्नीमन रोडवर देना बँकेच्या फूटपाथवर ते झोपत.

- फर्नांडीस म्हणतात, "तेव्हाच मला कळून आलं की रोज फूटपाथवर झोपणाऱ्या लोकांनाही आपल्या त्या जागेविषयी भयंकर आपुलकी आणि ओढ वाटते. एखादे दिवशी मी जागा बदलून दुसऱ्या फूटपाथवर झोपलो की तिथले लोक लाथ मारून उठवत आणि हाकलून देत. शेवटी मला ईस्टर्न वॉच कंपनीच्या खालच्या फूटपाथची जागा मिळाली आणि तिथे मी रोज रात्री निर्धास्तपणे झोपू लागलो."

पुढे काही दिवसांनंतर त्यांना 'टाईम्स ऑफ इंडिया'त प्रूफ करेक्टरची नोकरी मिळाली. सुमारे वर्षभरानंतर कामगारनेते डिमेलो मुंबईला परतले आणि त्यांनी जॉर्ज फर्नांडीस यांना परत मुंबईच्या गोदी कामगारांच्या कामासाठी ओढून घेतलं. मुंबईच्या कामगार चळवळीत जॉर्जचा शिरकाव झाला.

मुंबईचे रस्ते, गोदी नाका, कामगार मैदान इथेच त्यांचे राजकीय शिक्षण झाले. रात्रीरात्री जागून ते कामगारांची संघटना उभारल्यानंतर त्यांनी ट्रान्स्पोर्ट कामगार, म्युनिसिपल कामगार, बेस्ट कामगार, हॉटेल कामगार यांच्यामध्ये कामाला सुरुवात केली. आणि त्यांच्यांत आश्चर्यकारकरीतीने एकी घडवून आणली. आणि आज ते हिंद मजदूर पंचायत, एस्. टी. मजदूर सभा, बॉंबे लेबर युनियन (भारतातील सर्वांत मोठी युनियन, हिचे ६५,००० सभासद आहेत), म्युनिसिपल कामगार युनियन, बेस्ट कामगार युनियन टॅक्सीमेन्स युनियन, हॉटेल कामगार युनियन, गोदीकामगार संघ या आणि इतर अनेक कामगार संघटनांच्या अग्रभागी आहेत. वेगवेगळ्या कामगारांचे असंख्य संप त्यांनी घडवून आणले. अनेक लढे दिले. कित्येक वेळा मार खाल्ला आणि कित्येक वेळ यशही मिळविले.

## हॉटेल कामगारांचा संप

त्यांच्या दृष्टीने त्यांनी मिळविलेला सर्वांत मोठा संस्मरणीय विजय म्हणजे १६ मे १९६२ रोजी मुंबईच्या एक लाख हॉटेल कामगारांनी केलेला एक दिवसाचा अभूतपूर्व संप. हा संप कसा काय संघटित केला, याविषयीच्या विचारणा त्यांना ब्रिटन-अमेरिकेतील कामगार संघटनांकडूनही आल्या.

मुंबईतल्या सुमारे दहा हजार हॉटेलांमधून महिन्याला केवळ ५ ते ७ रुपयांवर काम करणाऱ्या गरीब हॉटेल कामगारांना संघटित करणे ही त्या वेळी अशक्य गोष्ट समजली जात होती. हॉटेल व्यवसाय हा कारखानदारीत धरला जात नव्हता आणि या कामगारांकडे सगळ्यांचेच पूर्ण दुर्लक्ष होत होते. बाहेरच्या गावाहून मोठी स्वप्ने

[पृष्ठ ५१ वर चालू]

# विचारधारे

— समीर

## ☐ इंडोनेशियात " दुर्योधनिझम् " !

इंडोनेशियन पार्लमेंट-सदस्यांचे सदिच्छा मंडळ भारताला येणे ही थोड्याच दिवसांपूर्वी अशक्य वाटणारी गोष्ट घडली असून सध्या इकडे आलेल्या मंडळाचे नेते सुबागियो रेक्षोदिपुरो (—सौभाग्य रक्षातिपुर ?) यांनी दिल्लीत गेल्या आठवड्यात एका पत्रकार-परिषदेत इंडोनेशियात सध्या काय चालले आहे, यावर प्रकाश टाकला.

ते म्हणाले, " लाल चीन ही इंडोनेशियाच्या पुढची एक मोठी राजकीय व आर्थिक समस्या आहे. इंडोनेशिया समाजवादी देशांच्या विरुद्ध नाही, पण " लाल चीनचा आम्हांला वाईट अनुभव आला आहे. " इंडोनेशियात स्थायिक झालेल्या चिन्यांना इंडोनेशियाविरुद्ध कारवाई करता येऊ नये म्हणून कुठले प्रतिबंधक उपाय करता येतील, याबद्दल सध्या विचार चालू आहे. पण लाल चीनला अनुकूल असलेले चिनी इंडोनेशियात फारच थोडे आहेत. उलट बरेचसे चिनी तैवानला अनुकूल आहेत, तर काही राजनिष्ठ इंडोनेशियन नागरिक आहेत.

इंडोनेशियन साम्यवादी पक्षावर बंदी घालावी लागण्याचे कारण म्हणजे गेल्या वर्षी ३० सप्टेंबरला त्यांनी राज्य उलथून पाडण्याचा जो प्रयत्न केला तो देशद्रोहाचा दुसरा प्रसंग होता. पहिले देशद्रोहाचे उदाहरण म्हणजे १९४८ साली राष्ट्रवादी इंडोनेशियन जनता डच आक्रमणाविरुद्ध लढा देत असताना साम्यवाद्यांनी बंड केले होते. एकदा देशद्रोह केल्यानंतर पुन्हा कट करण्याची संधी साम्यवाद्यांना कशी मिळाली ? भारताने बोध घ्यावा असे उत्तर. — सत्तेसाठी राजकारण खेळले जात असल्याने इंडोनेशियन पार्लमेंट व सरकार दुबळे झाले होते. पण साम्यवादी पुन्हा प्रबळ होणार नाहीत याची खात्री काय ? उत्तर : — त्यांच्या देशद्रोहामुळे लोक इतके भयंकर संतापले आहेत की ते पुन्हा प्रबळ होण्याची शक्यता नाही.

इंडोनेशियाची नवीन परराष्ट्रनीती याच तत्त्वांवर आधारलेली आहे. ती तत्त्वे म्हणजे परमेश्वरावर श्रद्धा, मानवतावाद, राष्ट्रवाद, लोकशाही आणि सामाजिक न्याय. आणखी एक मार्गदर्शक तत्त्व म्हणजे आशियायी समस्या आशियायी देशांनी आपापसांत सहकार्य करून आशियायी पद्धतीने सोडविल्या पाहिजेत. पण सध्या इंडोनेशियाचे नवीन सरकार पूर्वीच्या राजवटीतल्या अनेक गोष्टींना आळा घालण्यात गुंतले आहे. त्या म्हणजे अनागोंदी कारभार, भ्रष्टाचार, अनैतिकता, दुर्गुणी नोकरशाही आणि " दुर्नोइझम्. " दुर्नोइझम् म्हणजे काय ? उत्तर — हा शब्द " दुर्योधनिझम् "पासून तयार झाला आहे — व देशात जे जे कपटी व फसवे असेल त्याचे नाव ' दुर्योधनिझम् '

" भारत-इंडोनेशियाचे संबंध ?– इंडोनेशियाने भारताशी कधीही युद्ध केलेले नाही. "

## □ इराणचा समाधानी विद्यार्थी

उत्तर प्रदेशात अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांनी केलेल्या भीषण दंग्याचे वृत्त गेले बरेच दिवस सतत वाचल्यावर मनाला प्रश्न पडतो–आजचे भारतीय विद्यार्थी इंडोनेशियन विद्यार्थ्यांच्या मार्गाने जात आहेत काय ? त्यामुळे इतर देशांतल्या विद्यार्थ्यांबद्दल माहिती करून घेण्याची सध्या विशेष उत्सुकता वाटते. अशी एक संधी काही दिवसांपूर्वी मेहरी अहारी ही इराणी महिला दिल्लीला आली तेव्हा मिळाली. अहारी या इराण सरकारच्या युवक मार्गदर्शन संघटनेच्या मुलींच्या विभागाच्या प्रमुख आहेत. त्या म्हणतात, " इराणमधला तरुण वर्ग हा समाधानी आहे, व त्याच्यामुळे कुठलीही कठीण समस्या निर्माण झालेली नाही. " इतर देशांतल्या निराश व असमाधानी युवक वर्गापेक्षा इराणचा युवक व विद्यार्थी वर्ग फार निराळा आहे. त्यांच्या शिक्षणाची व पालनाची " पौर्वात्य पद्धत " आणि सर्वसाधारण इराणी कुटुंबांतला एकजिनसीपणा या गोष्टी इराणी विद्यार्थ्यांच्या मानसिक शांततेला कारणीभूत असाव्यात.

इराण सरकारच्या नियमांनुसार हायस्कूलमधून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला " सिपाह–इ–दानिश " किंवा " सिपाह–इ–बेहदाशा " म्हणजे शिक्षकांची सेना किंवा आरोग्याधिकाऱ्यांची सेना यांच्यापैकी एकीत नाव घालावे लागते. या सेनेतले " शिपाई " वरचेवर इराणी खेडेगावांतून व मागासलेल्या विभागांतून हिंडतात. या दोन संघटना इराणी सैन्याचेच विभाग समजल्या जातात आणि त्यांचा खर्चही लष्करी खर्चातून करण्यात येतो. प्रत्येक निरोगी हायस्कूल-विद्यार्थ्याने या संघटनेत दोन वर्षे काम केलेच पाहिजे असा दंडक आहे. या मार्गाने तरुणांच्या अंगात असणाऱ्या उत्साहाला वळण लावण्यात येते.

## □ विज्ञान व साहित्याचा संगम

निरनिराळ्या भारतीय विश्वविद्यालयांतून पसरलेल्या अमेरिकन शिक्षकांचा व विद्यार्थ्यांचा एक मेळावा नुकताच दिल्लीला झाला, त्या वेळी ऐकायला मिळालेली दोन महत्त्वाची मते :

दिल्ली विश्वविद्यालयात प्राणिशास्त्राच्या प्राध्यापिका डॉ. कु. ग्रोरक्लेज : अमेरिकेच्या व भारताच्या विज्ञान-शिक्षणक्रमात एक महत्त्वाचा फरक म्हणजे अमेरिकेत विज्ञानाच्या विद्यार्थ्यांना थोडेसे साहित्यविषयक विषयही शिकावे लागतात.

नागपूर विश्वविद्यालयात अमेरिकन साहित्याचे प्राध्यापक डॉ. फरस्वर्थ : भारतात निदान विज्ञानाच्या अध्यापनासाठी सर्वत्र एकच भाषा ठरविण्यात आली तर फारच चांगले होईल.

●

## दुसऱ्यांची लाथ

दुसऱ्यांची लाथ । बसे निष्कारण
पायांचे वळण । होय वक्र १
बसे श्रीमुखात । हात हतबुद्ध
अहिंसेचा शोध । दुर्बळांसी २
सदाचारी होता । होते तेहि गेले
खळगृही लोळे । वित्त सर्व ३
डोळे फुटण्याची । जेव्हा येत वेळ
पापाची नजर । मार्ग दावी ४
बुद्धिवादी वाणी । उपटते भक्ती
देवा झाली सक्ति । संशयाची ५
धर्म अधर्माचा । नसे ताळमेळ
देवा 'स्थळकाळ' । भासे श्रेष्ठ ६
धर्म संस्थापन । करी देवा आता
झालास बेपत्ता । पाषाणात ७

*—श्रीराम पंडित*

## पंढरी

सह्यगिरीच्या कुशीत रम्य कोकण भूमीत
चिमुकले गाव एक उभे राहिले डौलात ।।
आंबे फणसांची राई दाट तयाच्या सभोती
सदा निर्मळ जलाने गात निर्झर वाहती ।।
गोड अमृताहूनही झरी झरे निरंतर
पोट भरून प्राशावे पाणी तियेचे मधुर ।।
दूर डोंगरावरूनी येई खळाळत झरा
वृक्ष-वेलीतून धावे घोघावत रानवारा ।।
लाल मातीत शिवारी पिके जिरगा विपुल
उंच नभाला स्पर्शित ताड-माड नि पोफळ ।।
नसे हवेली बंगली असे जरी घरकुल
नांदतात देव माझे आई-वडिल प्रेमळ ।।
चाले भजन कीर्तन 'श्रमदेवां'च्या 'नगरी'
वाटे सदैव मजला माझे माहेर पंढरी ।।

*—रामचंद्र माणकू दिवेकर*

## शिशिर आला एकाएकी

शिशिर प्रकटला एकाएकी
गारव्यातली गाणी उधळित
टिपताना स्वर तू मी दोघे
वाट वेंधळी गेलो चालत.
गारवता अंगांगे अपुली
शिशिर शहारे पेटुन गेले
कळले तेव्हा तुला मला पण
आगीमधले सुख आगळे

पाने पाने भिरभिरली अन्
मूक जहाली झाडे झाडे
निष्पर्णातच घुमत राहिले
एक कबूतर वेडे वेडे
धुक्यात धरणी लपेटलेली
आभाळाला कवेत घेते
बावरलेले क्षितिज पाही ते
एक चिरंतन नाजुक नाते

*—दिनकर शिर्के*

# आस्वाद

'शिशिर आला एकाएकी' ही निसर्गाच्या आधाराने बहरलेली आणखी एक प्रेम-कविता. शब्दांच्या पुनरुक्तीने बहरलेली आणखी एक मजेदार लय तर येतेच, पण एखादी कल्पनाही अधिक स्पष्ट होते. कवितेची गेयता वाढवायला तर पुनरुक्तीचा फार उपयोग होतो. एखाद्या कुशल काव्यगायकाने या कवितेला चांगली चाल लावण्याचे मनात आणले तर अंगांगे, पाने–पाने, झाडे–झाडे, वेडे–वेडे इ. शब्दांची पुनरुक्ती करून दिनकर शिर्के यांनी उत्तम सोय करून ठेविली आहे. दुसऱ्याला कवेत घेणारी व्यक्ती आकाराने मोठी असावी ही सामान्य अपेक्षा. पण येथे कवीने सान्त घरणीच्या कवेत अनंत आकाशाला 'लोटून' दिले आहे. अर्थात् कल्पनेची भरारी वाईट नाही.' प्रियतमेच्या वृत्तीवर शृंगारापेक्षा वात्सल्याचा वरपगडा आहे, असे तर कवीला सूचित करायचे नाही ? क्षितिजाप्रमाणे रसिक वाचकही हे नाजूक नाते पाहताना बावरला तर आश्चर्य नाही !

सत्यधर्माची पायमल्ली आजच होत आहे असे नाही. सुरासुरांचा संग्राम जितका प्राचीन तितकाच धर्म आणि अधर्म यांची गल्लत प्राचीन आहे असे म्हणता येईल. भावनाप्रधान कविमनाला हे पाहवत नाही. आणि हात उंच करून महर्षि व्यासांप्रमाणे ते आक्रोश करते. हाच आक्रोश श्रीराम पंडित यांच्या 'दुसऱ्याची लाथ' या कवितेत आहे. कवी त्रस्त, संतप्त झाला यात खोटे काहीच नाही. कवी धर्मसंस्थापनेसाठी देवाला अवतार घेण्याचा आग्रह करीत आहे. कदाचित् देव 'कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे' असे तर नसेल ? कुणी सांगावे ?

सध्याचे जीवन जसे गुंतागुंतीचे झाले आहे तसेच वाङमयही त्यामुळे 'पंढरी-सारखी साधी, अनलंकृत कविता पाहिली की एक सात्त्विक आनंद वाटतो. रामचंद्र माणकू दिवेकर यांचे गाव सह्याद्रीच्या कुशीत कोकण– भूमीत आहे. एक एक छटा देत त्याचे अगदी साधे चित्र कवीने रेखाटले आहे. डोंगर, शेते, झरा, झोपडी सारी मूर्त होऊन समोर उभी राहतात. पण नुसती सृष्टी म्हणजे भावविश्व नव्हे. त्यात माणसे पाहिजेत ; प्रेमाची जिव्हाळ्याची. ती असली म्हणजेच घराची पंढरी होते.

—गोपीनाथ तळवलकर

# हुरहुर

विद्याधर भागवत

लग्न आणि मर्तिक हे बाबीचे आवडते कार्यक्रम आणि आज तर आपा साधलेच्या मुलाचे लग्न आणि यमू आतेचं बहुतेक मर्तिक, दोन्हीही साधणं त्याला अगत्याचं वाटत होतं—पेचच—

बाबी जागा झाला आणि एकदम दचकला.

खिडकीतून किरणांनी त्याच्या अंगावर उडी घेतली होती. त्याने एकदा तोंडावरून खसाखसा हात चोळून घेतला. गावातल्या न्हाव्याला सुतक असल्यामुळे दहाबारा दिवस तो गावात फिरकलासुद्धा नव्हता. वाढलेल्या दाढीमुळे बाबी अधिकच खरबरीत दिसू लागला होता.

'सगळे मेले न्हावी कुठे मरायला गेले कोण जाणे! हराम, वेळेवर कधी यायचे नाहीत!'

पुटपुटत त्याने अंथरूण गुंडाळले. विठ्ठल न्हाव्यावरचा संताप त्याने त्या गुंडाळलेल्या वळकटीवर काढला व वळकटी जोराने कोपऱ्यात फेकून दिली.

बाबीला पुटपुटत शिव्या द्यायची फार सवय. इतके दिवस दाढी वाढल्याबद्दल त्याला काही वाटले नव्हते; पण आजचा दिवस वेगळा होता. आपा साधलेच्या मुलाच्या लग्नाचे त्याला आज निमंत्रण होते. निमंत्रण मिळाल्यापासूनच त्याने त्या लग्नाला जायचे ठरविले होते. गावातील एकही लग्न त्याने कधी चुकविले नव्हते. लग्नाला गेल्यावर दक्षिणा मिळते. शिवाय एक दिवसाचे जेवण पदरात पडते. बाबीसारख्या एकट्याने जीवन कंठणाऱ्याला तर ही मोठीच पर्वणी.

पण केवळ यासाठीच हा लग्नाला जाणार होता असे नव्हे; त्याच्या दृष्टीने तिथे हजर राहण्याचे कारण फार महत्त्वाचे होते. जणू त्या लग्नाला जर तो गेला नसता,

तर नवऱ्या मुलाचे फार नुकसान झाले असते व त्याचा कलंक बाबीला लागला असता.

रात्री झोपल्या झोपल्याच त्याने मनाशी काही बेत आखले होते; पण सकाळी वेळेवर जाग न आल्यामुळे तो स्वत:वरच चिडला. कारण गावातल्या अनेक पूजा आटोपून त्याला बरीच महत्त्वाची कामे पार पाडायची होती.

तो धडपडत एकदा मोरीकडे धावला. मोरीवरचा कोनवासा तुटलेला होता. तो केव्हा डोक्यावर कोसळेल याचा नेम नव्हता. त्याला तिकडे पाहायला सवडच नव्हती.

'सगळे घर जरी मोडून गेले, तरी मी इथेच राहणार. कुठ्ठे जाणार नाही. मरायस्.'

पुन्हा एकदा पुटपुटला.



काल सकाळी याच वेळी त्याने आंघोळ करून एकदाची एक कळशी भरून आणली होती. त्या नंतर तो घरीच नव्हता. त्याच कळकट पाण्याने त्याने तोंड धुतले.

'जळ्ळे पाणी किती घाण ! त्या बोमडचास किती दिवस सांगतोय पाण्याचा डुरा उपस म्हणून. हराम तर उपसेल !'

चूळ भरतानाच तो पुटपुटत होता. त्याचा जन्मच असा पुटपुटण्यात गेला. घरात तो एकटा. घर दुरुस्त करण्याचे बेत रात्री तो झोपला की लगेच मावळतात. लग्न करण्याबद्दलचा त्याचा बेत मात्र अजून तग धरून आहे. इतके दिवस खटपटी केल्यावर मात्र तो निराश झाला आहे. आता त्याची थट्टाच केली जाते. आता कुणी त्याला विचारले, की तो म्हणतो–

'मला रे कोण देतोय मुलगी !'

त्याचे हे पालुपद ठरलेले. मग कुणाला तरी थट्टा करण्याची लहर येते. बाबीची थट्टा करणाऱ्यांची संख्या आता वाढत चालली आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सारे त्यात भाग घेऊन स्वत:ची करमणूक करून घेतात. एखाद्या लग्नसमारंभात बाबी गेला की सर्वांच्या चर्चेचे साधन म्हणजे बाबी.

'बाबी अगदीच कसा हाऽ ? " गावातली एखादी शेंबडी पोरसुद्धा म्हणते.

कुणी विचारतो, " आता तुझे रे कधी ? '

पण बाबीचे लक्ष नवऱ्या मुलीजवळ उभ्या असलेल्या बायकांच्या घोळक्याकडे असते. सगळ्या बायकांकडे क्रमाने निरखून पाहत असताना एखाद्या टपोऱ्या मुलीकडे त्याचे लक्ष जाते. हळूच तो शेजाऱ्याला विचारतो,

'ती मुलगी कुठली रे ? ' आपली आशाळभूत नजर त्या मुलीजवळ तशीच रोखून धरतो. तिचा संबंध आपल्याशी लावून तो मोकळा होतो.

'कुठे रे ? ' तो शेजारचा विचारतो.

'नवऱ्याच्या बाजूस उभी राहिलेली ती गोरी ? '

'ती तिसरी ? '

'नव्हे; तिच्या मागची.'

'हात् मेल्या ! ती बहीण माझी.'

बाबी एकदम ओशाळतो.

'तसे नव्हे; ओळखली नाही मी ! '

मग तो आपली टोपी जरा मागे करून उगाच खांद्यावरच्या उपरण्याची हालचाल करतो व भटजींच्या मंत्रात संभावितपणाने सूर मिसळतो.

असे प्रसंग वारंवार घडतात.

लग्न आणि एखाद्याचे मर्तिक हे दोन त्याचे आवडते कार्यक्रम. आतासुद्धा बाबीला एकदम आठवण झाली–

आपा साधलेच्या मुलाच्या लग्नाला तर जायलाच हवे; पण डेंगावरच्या यमू आतेची चौकशी करायलाही प्रथम जायला हवे. कारण ती मृत्युशय्येवर आहे, याची बातमी त्याने काढली होती. अशी मरणारी माणसे त्याची आवडती. शिवाय त्यांच्या घरच्यांच्या सुतकाच्या काळात त्यांची भिक्षुकी सांभाळायला मिळते. तसा बाबी परोपकारी !

उत्साहाच्या भरात डुऱ्यावर जाऊन दोन कळशा घसघसावल्या, थाड थाड अंग चोळले. डुऱ्यावर कुणीच नव्हता. नेसल्या पंच्याच्या निऱ्या सोडून सारे अंग खसखसून काढले.

'यमू आते सकाळीच गेचकली असेल. काय अगदीच हीऽ झाली होती.'

पुरुषसूक्त म्हणताना मध्येच पुटपुटत होता, यमू आतेच्या मृत्यूची बातमी आपल्यालाच प्रथम समजली पाहिजे. उत्साहाच्या व थोड्या काळजीच्या सुरात त्याचे पुरुषसूक्त चालले होते. आपले जानवे पंचाने पुसून काढले. आता बाहेर पडल्यावर प्रथम तिकडेच जायला हवे. आजपर्यंतचा रिवाज मोडता कामा नये. त्याचा तो एक आवडता छंद !

घाईघाईत पुन्हा पंचा पिळून हातातली कळशी भरून दणदण पाय आपटीत तो

घरात आला. उभ्याउभ्याच देव्हाऱ्यातले देव धुऊन काढले.

" जळले किती दगड ! लवकर संपतील तर हराम ! " पूजेच्या वेळी मंत्र म्हणू लागला.

त्याच्या वडिलांनी जमविलेली ही संपत्ती. गावातले कुठचेही घर ओसाड पडले की त्या घरातल्या साऱ्या देवांना बावीचे घर हे एकमेव आश्रयस्थान.

-'.... हा शाळीग्राम त्या कानेटकरांच्या घरचा. मरताना त्या म्हाताऱ्याची केवढी घरघर ऐकायला यायची ! अर्धांग झाला. अंगास किडे पडले. खांदा द्यायला कुणी तयार नाही. कासोटा खोवला आणि गेलो....'

पुटपुटत त्याने देवावर फुले पसरली. उदबत्तीची एक काडी पेटवून ठेवली. निरांजनात जळकी वात होती, तिच्यातच तिळेलाचा थेंब सोडून दिवा पेटवला.

सारी कामे भराभर आटोपून घेतली.

आता हारीने पूजा आटोपायच्या .. नंतर आपा साधलेच्या घरचे लग्न ... त्यापूर्वी यमू आतेची चौकशी केलीच पाहिजे.

दाराला कडी लावता लावता त्याचे बेत चालले होते. तो बाहेर पडला. यमू आतेच्या दारात जाऊन उभा राहिला. म्हातारी अद्याप जिवन्त असल्याची सारी चिन्हे बाहेरूनच त्याला दिसली.

" हरे कर्मा ! " स्वतःशीच पुटपुटला. पण त्याचे उद्गार तिथे जमलेल्यांपैकी कुणीतरी ऐकले.

'काय रे बाबी ?'

'काही नाही. म्हटले--'

'काय ?'

'म्हातारीचे रे !'

'अजून आशा आहे. शेवटचे प्रयत्न चालले आहेत !'

'कसले मेले प्रयत्न करता ?' बाबी निराशेने म्हणाला.

'च् ! च् काय, बोंबलतोस बाबी !'

'माणसाने वेळेवर मरावे कसे ? बुल्या शेंबेकराचे मरण कसे ? अगदी ठरवन ठेवल्याप्रमाणे. तसे हवे. हुकमी. मी होतो तिथे. जाळून घरी आलो आणि पावसास सुरुवात. तसे मरण हवे. कसे ?'

बाबीच्या तात्त्विक विचारांना साथ द्यायच्या मनःस्थितीत या वेळी कोणी नव्हता.

'मी जरा आपा साधल्याकडे जाऊन येतो.' तिथल्याच कुणाला तरी उद्देशून बाबी म्हणाला.

'मग इथे कशाला आलास ?'

'जरा म्हातारीचे ऐकून जावे म्हटले.'

'तिकडेच जा, वडे आहेत आज !' कुणाला तरी विनोद सुचला.

'आज संध्याकाळी तुझ्या कुमी पळसुलेचे लग्न होणार तर!'

कुणाला तरी विनोद सुचला. बाबीच्या मर्मावर घाव बसला. तेच त्याचे वर्म कुणी काढायला नको होते. हे लग्न जमले याचा त्याला राग होता. कुमीवर त्याचा डोळा होता. त्याला नाही तर नाही. पण निदान त्या आपाच्या मुलाला तरी ती दिवटी पोर मिळता नये अशी परोपकारी वृत्ती बळावत चालली होती. लग्नाच्या पूर्वी त्याला जायलाच हवे होते.

बाबीच्या दृष्टीने प्रत्येक क्षण मोलाचा होता. म्हातारी लवकर गचकली असती तर त्याच्या दृष्टीने बरे होते. बाहेर पडता पडताच साऱ्या गावाला प्रथम बातमी पोचविण्याचा त्याला मान मिळाला असता. सारी कामे करून पुन्हा म्हातारीला खांदा द्यायला हजर. दुपारचे लग्नही साधले असते.

पण आज बाबीचे दुर्दैव जिथे तिथे आड आले. पाच मिनिटे आणखी वाट पाहायला हरकत नाही. त्याच्या मनात विचार आला. तेवढ्यात त्याला मागची एक घटना आठवली.

भाऊ पुराणिकाकडची नर्मदाकाकू खलास झाली. बाबीला जणू स्वप्न पडल्याप्रमाणे ही बातमी प्रथम समजली. होता तिथून धावत गेला. काकू मेल्याची एकदा खात्री करून घेतली. तो तडक दामूमामांकडे चेंदवणला गेला.

दामूमामा सत्यनारायणाच्या पूजेला बसले होते.

'काय रे बाबी पुजेला?'

'नव्हे हो! नर्मदाकाकूला जाळायची तयारी चालली आहे. तुम्हांला सांगण्यासाठी हा असा आलो.'

दामूमामांच्या हातातले पोथीचे पान खाली पडले. नर्मदाकाकू ही त्यांची सख्खी बहीण. अचानक त्यांना ही बातमी समजली.

'केव्हा?' कुणीसे विचारलें.

'आत्ता. हा आलो तिथूनच!'

'म्हणजे अर्धा तास?'

'हो.'

'अरेरे! गेली बिचारी!'

'अरे पोट फुगले होते. जलोदर का काय म्हणतात तो आहे. आता प्रेत जळताना मारामार!'

दामूमामा सुन्न झाले. बाबीची चर्चा जोरात सुरू होती– पूजा पूर्ण करावी तरी पंचाईत. न करावी तर अर्धवट कशी ठेवायची?

बाबी मात्र मोठी कामगिरी पार पाडल्याच्या आनंदात तिथून सटकला होता.

घरात एकदम ओरड पडली तेव्हा बाबी विचारातून जागा झाला.

माणसे डोकी आपटून घेऊ लागली. बाबीला हायसे वाटले. त्याची लवकरच

तिथून सुटका झाली.

तो तिथून सटकला.

'अरे बाबी, जरा थांब–' शेजारच्या इसमाने हाक मारली.

'आलोच–' म्हणत पळत सुटला.

साऱ्या गावात बातमी पसरली. गर्दी जमली. बाबी घामाघूम होऊन परत आला. जमलेल्या गर्दीकडे पाहून त्याचा अभिमान जागृत झाला. आपल्या अंगात माणसे गोळा करण्याचे केवढे सामर्थ्य आहे! खुषीतच त्याने वाढलेल्या दाढीवरून हात फिरविला.

मग सारे आटोपेपर्यंत बारा वाजले. पुन्हा एकदा घरी जाऊन डुऱ्यावर आंघोळ केली. आता त्याला घाई करणे भाग होते. दोन्ही कार्यक्रम त्याला मिळाले होते.

बाबी आपा साधल्याकडे जाऊन पोचला तेव्हा लग्नाला दोन मिनिटेच शिल्लक होती.

पण नवरा मुलगा त्याला एकांतात मिळतो कसा? त्याला जर त्याच्या भावी पत्नीची हकीकत सांगितली असती, तर लग्न तिथल्या तिथे मोडले असते. आणि नवऱ्या मुलाला वाचविल्याचे पुण्य त्याच्या पदरात पडणार होते. अशी मुलगी घरात घेऊन संसार चालेल कसा? उद्या ती दुसऱ्याचा हात धरून पळाली तर? या चवचाल मुली काय करतील त्याचा नेम नाही. तरी बरे, आपल्याच गळचात पडली असती.

या कल्पनेने त्याने सुटकेचा श्वास सोडला; पण लगेच त्याला आपल्या कर्तव्याची जाणीव झाली. निदान नवऱ्या मुलाच्या वडिलांना– आपांना– तरी सांगायला हवे. पण या वेळी आपा मिळतात कसे?

अंतरपाट धरला तेव्हा त्याची तळमळ वाढू लागली. मंगलाष्टके सुरू झाली. बाबीने सुरात सूर मिळविला. मंगलाष्टके म्हणताना त्याची दृष्टी झरझर साऱ्या मंडळींवर फिरत होती.

.... ही अंबू. एवढी मोठी झाली? अद्याप तिचे लग्न व्हायचे आहे. वासूला विचारून पाहायला हवे. त्याने होकार दिला की–.... कुर्यात सदा मंगलम् ....

शेवटची ओळ मोठ्याने म्हटली. आपण इतरांबरोबर असल्याची खात्री करून घेतली.

अंत:पट दूर झाल्यावर त्याला वाईट वाटले. आपण एवढी घाई करून इथे आलो–

त्याच्या डोक्यात एक कल्पना आली. आता निदान त्या कुमीबद्दलची बातमी आपांना कळवावी. म्हणजे आपण कळविली नाही असे पाप आपल्यावर लागायला नको. माहीत असलेली गोष्ट आपण प्रामाणिकपणाने कळवावी.

स्वत:च्या कर्तव्यबुद्धीवर तो खुष झाला. सभोवार नजर भिरकावली. नवरा-नवरीला खुर्चीवर बसविले होते. अहेर चालले होते.

त्याने कुमीकडे एक जळजळीत नजर फेकली. ती आपली नजर चुकविते आहे असे त्याला वाटले.

त्याला राहवले नाही. त्याने साधल्यांना हाक मारली, ' आपा ! '

आपा धावपळीत गुंतले होते. चहा-फराळ कुणाला मिळाला ते जातीनिशी पाहत होते. बाबीने उभ्याउभ्याच फराळाचा द्रोण घेतला.

आपण ही काहीतरी चूक करीत आहोत. आपल्याला एक पवित्र कार्य करायचे आहे. फारच पवित्र. आजकाल या गोष्टी सर्वत्र चालल्या आहेत, म्हणून जग बुडते आहे.

त्याने पुन्हा हाक मारली—

' आपा—'

' काय रे, तुला चहा-फराळ मिळाला ? '

आपांनी विचारले.

' तसे नाही. जरा खाजगी—'

' मला वेळ नाही. बघतोस ना कसा धांदलीत आहे ? '

' अहो, वरपक्षाकडचे तुम्ही. वरपिते. तुम्हांला धांदल कसली ? '

त्याने आपला व्यावहारिक दृष्टिकोन मांडला.

' याबद्दल नंतर सवडीने बोलू. मग झाले ? '

' ते नाही म्हणायचे मला. ' बाबी मुद्यावर येऊन म्हणाला,

' जरा वेळ—'

' अरे बाबी, ' दुसऱ्याने हाक मारली.

' काय ? '

' काय सांगणारैस आपांना ! '

' ती नवऱ्या मुलीची भानगड—'

' मेल्या, गप्प राहा ! आता काय सांगून होणार मूर्खा ? '

' तुला काय समजते ? तू गप्प राहून पाहा. '

बाबीला हा अपमान सहन झाला नाही. मुलीकडच्याच कुणी तरी बाबीला पाहिले. तो म्हणाला,

' आता इथून बाहेर जाशील तर बरे. तुला लाडू मिळाला ? '

' हो. '

' दक्षिणा मिळाली ? '

' नाही. '

' थांब. द्यायला लावतो. अहो, याची दक्षिणा लवकर काढा. याला गावात खूप कामे आहेत. '

बाबीला बोलायलाच सवड मिळाली नाही. तो म्हणाला,

'माझे आणखी दुसरे कोणतेही काम आज शिल्लक नाही, फक्त–'

डोकीवर जरीचा रुमाल लावलेल्या त्या गृहस्थांना वाटले, ही ब्याद जरा लवकर जाईल तर बरे. त्यांनी ओरडून सांगितले, 'हां, बाबीची दक्षिणा म्हणतोय. जरा लवकर जाऊ द्या त्याला इतर कामांना—'

दक्षिणा कनवटीला लावीत बाबीने हाक मारली,

-'आपा—'

आपांनी ऐकलेच नाही. मुलीवाल्यांपैकीच बाबीला ओळखणाऱ्या एका गृहस्थाने बाबीला दटावले. हा काहीतरी घोटाळा करणार असे वाटून विषय बदलण्यासाठी त्यांनी विचारले,

'त्या दिवशी मग कवठीहून कसा आलास ?'

'केव्हा ?'

'त्या भजनाच्या दिवशी—'

लोकांना विषय मिळाला. तिकडे अहेर घेण्याचे काम चालू होते. तुरळक माणसे मंडपात शिल्लक होती.

बाबीच्या दृष्टीने सारेच चुकले होते. सारेच मुसळ केरात ! नवऱ्या मुलावर केवढा अन्याय होणार ? आपाचा मुलगा सर्वत्र नजर फिरवीत खुर्चीवर बसला होता. हळूच नवपत्नीकडे पाहून घेत होता. नमस्कारांना आलेल्या आप्तेष्टांकडून प्रतिनमस्कार करून आपल्या तोंडाची फट जरा वाढवीत होता.

बाबीने ते पाहून घेतले. त्याला पुन्हा एकदा आपा साधलेच्या मुलाबद्दल सहानुभूती वाटली. लक्षात आल्याबरोबर त्याने हाक मारली,

'आपा,—'

त्या बरोबर दुसऱ्याने पुन्हा एकदा विषय बदलला.

'गेल्या महिन्यातली गोष्ट रे. भजनाच्या वेळी. भरपूर उसळ दाबलीस तेव्हा—'

'अरे, जरा वेळ पोटात दुखले.' बाबीला त्या प्रसंगाची आठवण झाली.

'तसे नव्हे रे—'

'मग कसे ?'

'तुझ्या छत्रीत पोरांनी उसळ भरून ठेवली तेव्हा—'

'मेले हलकट रे—'

त्याच्याभोवती मग मंडपातली सारी पोरे जमली. तिकडे होमाची तयारी चालू होती.

'काय झाले ?'

'माझ्या छत्रीत उसळ भरली मेल्यांनी. मला रे काय माहीत. मी छत्री उचलली. चाललो.' बाबी आपल्या फजितीचे वर्णन चिडून करू लागला—

'आणि छत्री जेव्हा उघडली–सारे वाटाणे अंगावर !'

एकच हशा पिकला.

'कोण रे ? ' होमाकडे बसलेल्यापैकी एक शिष्ट आवाज.

'बाबीची मजा करताहेत. करू देत. तेवढीच करमणूक.' दुसरा आवाज.

'हं. मग ?' पुन्हा विषयाला आरंभ.

'मग काय ? डोंबल ?'

'दक्षिणा मिळाली ?'

'होय.'

दक्षिणेवरून बाबीला आठवण झाली.

'आपा,—'

तेवढ्यात आपा बाहेर आले. बाबी उठला. पण आपा निघून गेले.

'बाबी—'

'चल बाहेर जाऊ.'

'कशाला ?'

'ती मागची हकीकत—'

'कुणाची ?'

'त्या नवऱ्या मुलीची—'

काही कुटाळ माणसे त्याच्याबरोबर बाहेर गेली. त्याला वाटले, आता लोकांना हे सांगितलेच पाहिजे. नाहीतर लोकांनी त्या प्रकरणात त्याला जबाबदार धरले असते.

'मग नाव कुणाचे घेतले रे तिने ?'

'माझेच नाव घेतले त्या मेलीने.'

'खरा कोण ?'

'तो गण्या जोशी—मेल्याने तिला पैसे देऊन माझ्या नावावर खपविले. हल्ली नीती राहिली नाही बुवा या कलियुगात.'

'तुझे का नाव घेतले ?'

'मी त्याची एक भानगड उघडकीला आणली. आणि त्या कुमीबद्दल मी मागणी घातली होती पूर्वी. तेव्हा त्याला वाटले, आयता हा मिळाला. घालू याच्या अंगावर.'

'कोणती भानगड ?'

'मेल्यांनी माझा सूड उगवला.'

'कशाबद्दल ?'

'एकदा तो गेला होता भिकल्या भावणीकडे. त्याची झाली गम्मत—'

रंगात येऊन बाबी सांगू लागला.

'कोणती गम्मत ?' सर्वांची उत्सुकता ताणली गेली.

'तर रे ! त्याचा तो पोर गोविंद, तोही त्याच रात्री भिकल्याकडे गुपचूप गेला

होता म्हणे –'

'मग ?'

'मग रे काय, चोरून दोघेही बाहेर पडले. कोण कोणास बोलणार ?'

'तुला रे कसे समजले ?'

'तोही असेल तिथेच घुटमळत !' कुणाला तरी थट्टा करण्याची लहर आली.

'छे !' पाल झटकावी तसे त्याने झाडले, 'ती भिकल्याची मुलगी आली होती.'

'तुझ्याकडे ?'

'नव्हे आगरात.'

'ती बोलली तुझ्याजवळ ?'

'होय.'

'मग तू काय केलेस ?'

'मी ही भानगड गावात सांगितली.'

'म्हणून गण्याने तुझे नाव घेतले कुमीच्या बाबतीत ?'

'होय. गण्याने पैसे देऊन पढवून ठेवले. मी सापडलो, गरीब. पण मी गप्प राहणार नाही. आपा साधले आहेत परकी. त्यांचा मुलगा साधा. त्यांच्या गळ्यात हे पाप अडकले –'

'अरे, हळू बोल, हळू बोल.–' एकाने दटावले.

'का ? कुणाची चोरी आहे ?'

तिकडे वरातीची तयारी चालली होती. सगळीच घाई.

'आपांना भेटल्याशिवाय जाणार नाही मी.' बाबी पुटपुटला.

'आपा कुठे ?'

'का ?'

'त्या मुलीची भान......'

बाबीला पुन्हा दुसऱ्या विषयात गुंतून ठेवण्यासाठी साऱ्यांनी प्रयत्न केले. बऱ्याच वेळाने वरात निघाली. बाबीचा जळफळाट होऊ लागला. त्याला बोलायचे होते आपांशीच, पण कुणीच त्याला हे बोलू देत नव्हता.

मंडपातून वरात वरपक्षाच्या उतरण्याच्या ठिकाणी गेली. आपा मात्र कुठे दिसेनात. बाबी चुकचुकला. त्याला नवऱ्याची दया आली.

'अरेरे !' तो पुटपुटला.

'काय रे ?'

'फसला बिचारा !'

'कोण ?'

'नवरा !'

'हळू बोल !'

अधून मधून संभाषण व्हायचे.

आपांच्या घरात नाव घ्यायचा कार्यक्रम चालला होता. बावीने एक दीर्घ जांभई दिली. सारा समारंभ आटोपून वरपक्षाकडील मंडळी लगेचच्या गाडीने जायची होती. मग आपांची भेट होणार नव्हती.

बाबी वाट पाहत तिथेच घुटमळत राहिला. संध्याकाळपर्यंत.

सगळे निघून गेले. त्याला कुणाशीही नीट बोलता आले नव्हते.

त्याने पंचाची कनवटी एकदा नीट केली. दक्षिणा चाचपून पाहिली. चडफडतच घरी आला.

एव्हाना काळोख पडू लागला. सकाळपासून चाललेल्या धावपळीमुळे त्याला थोडे थकल्यासारखे वाटले.

रात्री कशीबशी त्याने पेज शिजवून खाल्ली.

यमूआते लवकर गचकली असती, तर त्याला सारे कार्यक्रम व्यवस्थित पार पाडता आले असते. यमूआतेचा त्याला राग आला होता. एका लाथेसरशी त्याने अंथरुण उलगडले.

कुमी पळसुले आता आपा साधल्याच्या मुलाला मिळाली होती.....

मेलीने मला फसवावे म्हणजे काय ?...

आपा साधलेकडे जाऊन तिच्याबद्दल सांगितलेच पाहिजे...त्या निमित्ताने एकदा कुमीला तरी नजरेखाली घालता येईल. त्याच्या मनात तोच विचार प्रबळ झाला. एकदम मोहरला...कुमीची आणि त्याची झालेली एकान्तातील भेट आठवली. दिवा फुंकून त्याने तो प्रसंग आपल्या डोळ्यांसमोर उभा केला.

मग निराशेने किती तरी वेळ तो काळोखाकडेच पाहत राहिला.

● ● ●

परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.

श्री. ब. मो. पुरंदरे

यांची एक ऐतिहासिक कादंबरी




मूल्य तीन रुपये

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २

## ☐ ज्या प्रपंचात राम नाही त्या प्रपंचात आराम नाही

जगामध्ये सर्वस्वी खरे अस्तित्व एकच असले पाहिजे, त्यालाच आपण "भगवंत" असे म्हणतो. भगवंत हा अत्यंत सूक्ष्म असल्यामुळे मनुष्याचा विचार त्याच्यापर्यंत पोहोचू शकत नाही. मानवी विचार हा शब्दमय आहे म्हणून विचारांच्या भूमिकेवर उभे राहून भगवंताची कल्पना करण्यास शब्द हेच साधन आहे, याला "नाम" असे संत म्हणतात. ज्या अंत:करणात नाम आहे, म्हणजे ज्या अंत:करणामध्ये भगवंताबद्दल, अस्तित्वबुद्धी, भाव, श्रद्धा आहे तेथे भगवंत विशेष प्रकट झालेला दिसून येतो. भगवंताबद्दल आस्तिक्यबुद्धी असणे म्हणजे स्वत:बद्दल नास्तिक्यबुद्धी असणे होय. एका म्यानात ज्याप्रमाणे दोन दोन तलवारी राहू शकत नाहीत त्याप्रमाणे "मी" आणि "श्रीभगवंत" एका अंत:करणात राहू शकत नाहीत. संत हे भगवंताशी एकरूपच झालेले असतात. भगवंताचे नाम घेणे म्हणजे आपल्या कर्तेपणाचा अभिमान कमी करणे होय. नामाचे प्रेम लागले म्हणजे कर्तेपणाचा अभिमान कमी होतो. कर्तेपणा भगवंताकडे सोपविल्यावर आपली स्वत:ची इच्छा राहत नाही. जेथे इच्छा नाही तेथे यशापयशाचे महत्त्वच उरत नाही. कधी सुख तर कधी दु:ख, कधी यश तर कधी अपयश हा प्रपंचाचा धर्मच आहे असे ओळखून आपल्या आयुष्यात घडणाऱ्या सर्व घटना "त्याच्या" इच्छेने व सत्तेने घडून येतात, अशी जाणीव ज्याच्या अंत:करणांत उमटली त्याला भगवंताचे खरे अस्तित्व समजले. "मी खरा नसून तोच खरा आहे" हे सांगण्यासाठी जेथे मीच उरत नाही ती खरी पूर्णावस्था होय. तेथे "मी त्याला जाणतो" हे देखील संभवत नाही. अशा रीतीने ज्यांनी आपले सर्वस्व मला दिले (आणि अशी मंडळी काही थोडी नव्हती.) त्यांना त्या मानाने मला परत देता आले नाही. बाजी जिंकणे किंवा दुसऱ्याचे अंत:करण न दुखावता बोलणे हे वाचेचे तप आहे. प्रत्येक मनुष्याचा दोष तर त्याला सांगायचा पण त्याचे अंत:करण न दुखवता. खरोखर मला असे वाटते की एकच मनुष्य पूर्णत्वाला जाण्यापेक्षा (अर्थात् तो गेला तर फारच उत्तम) पुष्कळ माणसे थोडी पुढे जाणे चांगले. संत ओळखू येण्यास व त्यांची भेट घडण्यास भगवंताचे नामच घेत राहणे आवश्यक आहे. "नाम" घेत असताना सदाचरण कधी सोडू नये, नीतीच्या मर्यादा कधी ओलांडू नयेत, निराश कधी होऊ नये. देहाला उगाच कष्टवू नये. पण काही झाले तरी भगवंताचे "नाम" कधी सोडू नये.

## ☐ मनाचा स्वस्थपणा, हाच खरा शांतपणा

परमात्मा हा आनंदरूप आहे, भगवंताकडून येणारी शांती हेच समाधान होय. प्रत्येक गोष्टीत मनुष्य आनंद पाहत असतो. सत्य ही आनंदाची खूणच आहे. वारा आला त्याला वाटते बरे झाले. पाऊस आला की त्याला वाटते आता गारवा येईल, कोणत्याही तऱ्हेने काय, मनुष्य आनंद साठवू पाहत असतो. मनुष्याला भूक लागली तेव्हा तो जर अन्न खाईल तर त्याचे पोट भरेल व त्यापासून त्याला आनंद होईल, परंतु त्याने विष खाल्ले तर मात्र त्याने आनंद न होता मरण मात्र येईल, तसे आपले होते. आपण विषयांतून आनंद घेऊ पाहतो आणि तो बाधक होतो. आपण सत्कर्मे करताना पोटात विषयांचे प्रेम ठेवून केली तर त्यामुळे विषयच पोसला जाऊन त्यापासून त्याला समाधान लाभू शकत नाही. याकरिता कर्तव्यबुद्धीने कर्म करावे, म्हणजे ते बाधक ठरत नाही. जन्मभर मनुष्य जो धंदा करतो त्याच्याशीच तो तद्रूप होऊन जातो. एखादा वकील घ्या. तो त्याच्या धंद्याशी इतका तद्रूप होतो की मरतेवेळी वादच करीत जाईल, नोकरी करणारा नोकरीशी इतका तद्रूप होतो की स्वप्नात देखील तो नोकरी समजूनच राहतो. कर्म कसे करावे, तर त्याच्यातून वेगळे राहून लग्नाचा सोहळा भोगावा, लाडू खावेत परंतु ते दुसऱ्याचे आहेत. आपल्या मुलीचे किंवा मुलाचे नाहीत, नाही तर व्याह्यांची काळजी लागायची किंवा हुंडा मिळतो की नाही इकडे लक्ष ठेवायचे, त्यामुळे तापच निर्माण होईल. कर्माशिवाय कोणालाच राहता येत नाही. एखाद्याला शिक्षा द्यायची म्हटले की अगदी हलायचे नाही. पापणी, हात, पाय, काही पण हलवता कामा नये, तर ते तसे शक्य नाही. काही ना काही तरी कर्म हे होणारच. भगवंतांनी अशी काही सांगड घालून दिली आहे की कर्म केल्याशिवाय गत्यंतरच नाही. परंतु ती कर्मे 'रामकर्ता' ही भावना विसरून केल्यास बाधक होतात, आणि मरणापर्यंत माणूस पुढील जन्माची तयारी करतो. तेव्हा देहाने कर्म करतानाही तो मी नव्हे — हे जाणून कर्म करावे. **कामावरून आल्यावर नोकरीचे सर्व विसरून जावे.** हात, पाय आपण स्वच्छ धुतोच ना, त्याप्रमाणे मनही स्वच्छ करून देवाचे ठिकाणी लावावे. **देवाला भजून काळजी करणे, हा वेडेपणाच म्हटला पाहिजे. मनाचा स्वस्थपणा हाच खरा शांतपणा.**

समाप्त

# आणि ड्रॅगन जागा झाला

लेखांक बारावा

अरुण साधू

माओ-त्से-तुंग आणि चुह तेह अशा रीतीने चिंगकाशान तळावर एकत्र आले असतानाच चीनमध्ये इतरही ठिकाणी अशीच काही सोव्हिएटस् निर्माण होऊ लागली होती. हुनान आणि हुपेह प्रांतांच्या पश्चिम सीमेवरील अशाच एका दुर्गम स्थळी हो लुंग नावाच्या एका लाल अधिकाऱ्याने आपला तळ स्थापन केला होता. हा पुढे कोमिन्टांगमध्ये गेला. तसेच हुनान–हुपेह–कियांगसी या सीमांवरदेखील पेंग तेह हुई या पूर्वी कोमिन्टांगमध्ये असलेल्या पण आता फुटून निघालेल्या अधिकाऱ्याने सोव्हिएट स्थापन केले होते.

या मोठ्या तळांशिवाय ठिकठिकाणी छोटी छोटी सोव्हिएटस् कावळ्यांच्या छत्र्यांप्रमाणे साऱ्या चीनभर डोकी काढू लागली होती. या सोव्हिएटस्चा मध्यवर्ती कम्युनिस्ट पक्षाशी काही संबंध नव्हता. ठिकठिकाणचे स्वयंभू नेते आपापल्या मतांप्रमाणे सोव्हिएटस् चालवीत.

या सोव्हिएटस्चे क्षेत्रदेखील नेमके ठरलेले नसे. कोठे कोमिन्टांगच्या सैन्याच्या नजरेतून सुटलेले दूरचे खेडे तर कोठे दोन पर्वतरांगांनी संरक्षित असलेले एक-दोन तालुके यांमध्येच या सोव्हिएटस्चा अधिकार चाले. कोमिन्टांग सेना मोठ्या संख्येने एखाद्या ठिकाणी आली की ही सोव्हिएटस् आपोआप नाहीशी होत आणि सेना निघून गेली की, महापुरातील शेवाळाप्रमाणे ती पुन्हा डोकी वर काढत. माओ आणि चुह यांचे चिंगकाशान पर्वताभोवतीचे सोव्हिएट हेच त्यांतल्या त्यात जरा मोठे आणि स्थिर होते.



सोव्हिएटस्‌ची संख्या जसजशी वाढू लागली, तसतशी लाल सेनाही फुगू लागली. लाल सैन्यातले बहुतेक सैनिक शेतकऱ्यांमधून आणि कोमिन्टांगच्या सैन्यामधून आलेले असत. कोमिन्टांग सैन्यातून पकडलेले सैनिक सैन्यात घेणे खरे म्हणजे धोक्याचे होते. पण लाल सैन्यात कोणताही माणूस एकदा शिरला की, त्याचे स्वरूप आणि त्याची मनोधारणाच एकदम बदलून जात असे, इतका लाल सैन्याचा प्रचार जबरदस्त असे. माओच्या चिंगकाशान येथील सोव्हिएटवर चँग-कै-शेकच्या सैन्याचे एकामागून एक हल्ले होत होते. त्यामुळे लाल सैन्यातील सैनिकांची मृत्युसंख्या मोठी होती. त्यामुळेच पकडलेल्या शत्रुसैनिकांवर एक दोन दिवसांत संस्कार करून माओ त्यांना लगेच आपल्यातर्फे युद्धात पाठवी. माओला आपल्या प्रचाराच्या प्रभावीपणाची इतकी खात्री होती, की शत्रूच्या पकडलेल्या सैनिकांना तो केवळ काही दिवसांच्या परीक्षेनंतर तुकड्यांचे आणि कंपन्यांचेही अधिकारी म्हणून खुशाल नेमून टाकी.

**माओ लिहितो. . . .**

१९२८ च्या नोव्हेंबरमध्ये माओ-त्से-तुंगने आपल्या परिस्थितीचा अहवाल चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीला पाठवला. त्यात त्या वेळच्या लाल सैन्याचे खरेखुरे स्वरूप दिसते.

माओ लिहितो, " लाल सैन्याची आर्थिक स्थिती फार हलाखीची आहे. सैन्यातील प्रत्येकाला रोज तांदूळ आणि इतर गोष्टींसाठी फक्त पाच सेन्टस् दिले जातात. त्यासाठी सैन्याला महिन्याला दहा हजार चांदीच्या डॉलर्सचा खर्च येतो आणि एवढे पैसे आजूबाजूच्या जमीनदारांकडून जप्त करून आणावे लागतात. हिवाळ्यासाठी आम्ही साऱ्या सैन्याला पुरेल एवढे गरम कापड मिळविले आहे खरे, पण इथे थंडी भयंकर आहे. आणि अजून कित्येक सैनिक दोन साधे कपडे एकावर एक चढवून आपली थंडी भागविण्याचा प्रयत्न करतात. एवढे मात्र खरे, की जे कष्ट भोगायचे ते आम्ही सारे मिळून भोगतो. सैनिकांपासून कमांडरपर्यंत सर्वांना सारखेच पैसे आणि धान्य दिले जाते. त्यामुळे सैनिकांना अधिकाऱ्यांचा कधीच मत्सर वाटत नाही...

...... अधिकारी सैनिकांना कधी मारीत नाहीत. अधिकाऱ्यांना आणि सैनिकांना सारखेच वागविले जाते. सैन्यातील दिखाऊ औपचारिकपणा आम्ही काढून टाकला आहे. जेवणाची व्यवस्था सैनिकच बघतात....... या सर्व व्यवस्थेमुळे सैनिक खूष आहेत. विशेषतः, नव्यान पकडलेले सैनिक हे सारे बघून खूष होतात. कोमिन्टांग सैन्यात अधिक पैसे मिळत असले तरी आमच्या सैन्यात आल्यावर मुक्त झाल्यासारखे त्यांना वाटते. कोमिन्टांग सैन्यात शेळपट म्हणून समजले गेलेले सैनिक आमच्याकडे आल्यावर मात्र बहादुरी गाजवतात. याचे कारण त्यांच्या मनावर या समानतेचा झालेला परिणाम .... आपण दुसऱ्या कोणासाठी लढत नसून आपल्या लोकांसाठी लढत आहोत, असे त्यांना वाटते.... लाल सैन्य हे एखाद्या भट्टीप्रमाणे आहे. पकडलेला शत्रुसैनिक त्यात टाकला, की तो ताबडतोब वितळून त्याच्यातून एक नवाच सैनिक तयार होतो. ....

..... शत्रुसैन्यात प्रभावी प्रचार करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे पकडलेल्या शत्रुसैनिकांना उत्तम वागणूक देऊन, त्यांच्यावर औषधोपचार करून त्यांना सोडून देणे. शत्रुसैन्याची एखादी तुकडी अथवा कंपनी पकडली, की त्यांच्यात ताबडतोब प्रचार सुरू होतो. ज्यांना परत जायचे आहे त्यांना प्रवासखर्च देऊन सोडून देण्यात येते. त्यामुळे 'पकडलेल्या प्रत्येकाला कम्युनिस्ट ठार करतात' या अफवेवर कुणी विश्वास ठेवीत नाहीत. पकडलेले शत्रुसैनिक परत जाताना त्यांना प्रेमाचे निरोप दिले जातात. आणि या प्रत्येक निरोप समारंभात परत जाणारे शत्रुसैनिक कृतज्ञता व्यक्त करणारी भावपूर्ण भाषणे करतात. ...."

पकडलेल्या सैनिकांशी वागण्याची जी पद्धत माओने उचलली होती तीच पद्धत जमीनदार आणि श्रीमंत शेतकऱ्यांशी वागतानाही त्याने उचलली. लाल सैन्याने जमिनीचे समान वाटप केल्याने श्रीमंत जमीनदार चिडून असत. लष्करी सुभेदारांच्या किंवा कोमिन्टांगच्या सैन्याने तो मुलूख नंतर व्यापलाच तर हे श्रीमंत शेतकरी लगेच त्यांच्या बाजूने जात आणि पळून गेलेल्या लाल सैनिकांची घरे दाखविण्यास मदत करीत.

ते सैन्य निघून गेल्यानंतर लगेच पुन्हा लाल सैन्य डोके वर काढी. पण ते या फितूर शेतकऱ्यांना ठार करीत नसत. "फितुरांना ठार करू नका," "आपले शेत पिकविण्यास फितूर परत आले तर त्यांचे स्वागत आहे" अशा घोषणा लाल सैनिक देत. त्याचा योग्य तोच परिणाम होत असे.

एवढे जरी असले तरी चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीचा आणि कोमिन्टांग सल्लागारांचा या सोव्हिएटस् चळवळीवर मुळीच विश्वास नव्हता. कारण या चळवळीवर त्यांचा स्वतःचा ताबा नव्हता—त्यांचा स्वतःचा हुकूम चालत नव्हता. शिवाय चळवळीला खऱ्याखुऱ्या पवित्र कम्युनिस्ट चळवळीचे स्वरूप कोठे होते ? औद्योगिक कामगारांचा या चळवळीत कोठे भाग होता ? त्याऐवजी शेत-



चिंगकाशानच्या एका गुहेत – चुह आणि माओ

करीच ही चळवळ चालवीत होते. कम्युनिस्ट पोथीत ही चळवळ बसत नव्हती. त्यामुळे अधिकृत चिनी कम्युनिस्ट पक्षाचे या चळवळीकडे तसे दुर्लक्षच होते.

## चिंगकाशान सोडले

दरम्यान चिंगकाशान तळावरील परिस्थिती असह्य होत होती. आपणहून लाल सैन्यात येणाऱ्या स्वयंसैनिकांचा पूर लोटला होता. सैन्याची संख्या ११,००० चे वर गेली होती. त्या डोंगरी तळावर एकच गर्दी उसळली होती. त्या सर्वांसाठी त्या डोंगरी भागात धान्य पिकविणे शक्य नव्हते. शत्रुसैन्यापासून जिंकून घेतलेल्या मालाचा पुरवठा संपत आला होता. कोमिन्टांग सैन्याचे एकामागून एक हल्ले अधिकाधिक जोराने होत होतेच. लाल सैन्याचे नीतिधैर्य ढळू लागले होते. चिंगकाशानहून शक्य तेवढ्या लवकर तळ हलविणे आवश्यक होते.

शेवटी माओ आणि चुह तेह यांनी आपले सैन्य हलविण्याचा निश्चय केला. दक्षिणेला कियांगसी प्रांताच्या सरहद्दीच्या आत असलेल्या घनदाट जंगलांतील तुंगकू व सिंगकुओ या शहरांमध्ये अगोदरच शेतकऱ्यांनी उठाव केले होते. ती जागा आपल्या नव्या तळासाठी निश्चित करून १ जानेवारी १९२९ रोजी माओ व चुह

तेह आपल्या सैन्यांसह चिंगकाशान पर्वतावरून खाली उतरले. पर्वतावरील उरलेल्या सैन्याची व्यवस्था माओने पेंग तेह हूई याचेकडे सोपविली.

चिंगकाशान तळावरून खाली उतरलेल्या त्या छोटयाशा लाल सैन्याचे त्या काळच्या आधुनिक सैन्याशी कुठल्याही तऱ्हेचे साम्य नव्हते. त्यांच्या अंगावर जुने पुराणे, फाटके सुती कपडे होते. त्यांच्या दाढया वाढल्या होत्या. डोक्यावरचे लांब केस खांद्यावरून खाली उतरले होते. कित्येक सैनिक अनवाणी पायांनी चालत होते. निम्म्याहूनही कमी सैनिकांजवळ बंदुका होत्या. इतरांजवळ भाले, कुऱ्हाडी व तलवारी हीच काय ती शस्त्रे होती. एखाद्या मध्ययुगीन कालातील दरिद्री दरोडे-खोरांच्या सैन्याप्रमाणे त्यांचे स्वरूप दिसत होते.

आजूबाजूंची पर्वतशिखरे बर्फाने चकाकत होती. उंच उंच हिरव्यागार पाईन वृक्षांची दाटी त्या जंगलात होती. एकमेकांपासून दूर दूर अशी छोटी छोटी कित्येक खेडी त्या जंगलांमधून वसली होती. खेडयांमधून सैन्याला पुरेसे धान्य मिळत नव्हते, म्हणून बराच काळ सैनिकांना कंदमुळांवर भागवावे लागे. रात्री थंडी कडक पडत असे. थंडीच्या तडाख्याने बरेच सैनिक रात्रीतून मरून पडत. चिंगकाशान तळावरून ते खाली उतरले तेव्हा सैन्यसंख्या चार हजारांच्या आसपास होती. ती कमी होऊ लागली. डोंगरी अवघड दऱ्यांतून त्यांना वाट काढावी लागे. कित्येक वेळी वाटच सापडत नसे. चीनमधील तो सर्वांत दुर्गम प्रदेश होता. आणि क्रांतीलाही तो प्रदेश अतिशय अनुकूल होता.

त्या वेळीही कियांगसी प्रांतात कोमिन्टांग विरुद्धच्या अनेक भूमिगत चळवळी चालूच होत्या. एकामागून एक आलेल्या भ्रष्ट कोमिन्टांग गव्हर्नर्सनी कियांगसी प्रांत लुटून फस्त केला होता. ठिकठिकाणच्या जमीनदारांनी स्वतःच्या संरक्षणासाठी मजबूत किल्ले बांधून अन्नधान्याचा भरपूर साठा जवळ जमा करून ठेवला होता. आजूबाजूच्या शेतकऱ्यांना हे जमीनदार गुलामांप्रमाणे वागवीत. ठिकठिकाणी पर्वत शिखरांवर, दऱ्यांमध्ये ताओईस्टांची देवळे विखुरली होती. प्रांतांतील या भागातच ताओ पंथाचा उदय झाला होता. हुनान प्रांताप्रमाणेच कियांगसीमधील शेतकरीही बंडाला उद्युक्त झाले होते. गेल्या काही शतकांत या प्रान्तामध्ये शेत-कऱ्यांनी अनेक बंडे केली होती व ती मोडून काढण्यात आली होती.

लाल सैन्याचे तुंगकू आणि सिंगकुओच्या दिशेने हळूहळू मार्गक्रमण चालू होते. वाटेत अनेक छोटया छोटया झटापटी कराव्या लागत होत्या. ही दोन्ही शहरे चांगलीच सुरक्षित होती. विशेषतः सिंगकुओ हे एका उंच पर्वतावर वसलेले शहर चारी बाजूंनी पर्वतशिखरांनी वेढले होते. हिवाळयामध्ये दाट धुक्यामुळे, हिमामुळे व ढगांमुळे ही शिखरे दृष्टीसही पडत नसत. परंतु सिंगकुओला पोचण्याअगोदर वाटेतील तापोतेइ नावाचे कोमिन्टांगच्या हाताखालचे एक गाव घेणे आवश्यक होते. तापोतेइमध्ये कोमिन्टांगचे मोठे सैन्य होते.

## मैदानी युद्धातील पराभव

त्या गावाला हुलकावणी देऊन जाण्याचा माओने बराच प्रयत्न केला. पण शेवटी ते जमले नाही. गावावर सरळ हल्ला करावा लागला. लाल सैन्य जिंकले खरे पण हा विजय सुखाचा नव्हता. लढाईत अर्धे लाल सैन्य खलास झाले. दोन हजार लाल सैनिक गारद झाले होते.

"भयंकर... भयंकर..." आपल्या दुर्दशा झालेल्या सैनिकांची स्थिती पाहून चुह तेह ओरडला. "हे युद्ध नव्हे. हा केवळ रक्तपात आहे."

लाल सैन्याने अगोदर अनेक वेळा पराभव सहन केले होते. पण या युद्धातील विजय त्यांना फारच महाग पडला होता. बर्फाळ जमिनीवर रक्ताळलेल्या सैनिकांचे देह इतस्ततः विखुरले होते. जखमी सैनिक पाण्यासाठी ओरडत होते. जखमांनी विव्हळत होते. संध्याकाळ झाली तशी आजूबाजूच्या खेड्यांतील स्त्रिया जखमी सैनिकांची शुश्रूषा करण्यासाठी येऊ लागल्या. माओ आणि चुह तेह सैनिकांची प्रेते मोजत, जखमी सैनिकांची विचारपूस करीत हिंडत होते. ते दृश्य पाहून त्यांनी ठरवले, पुन्हा सरळ हल्ला करून मैदानी लढाई करायची नाही. झालेली हानी भरून काढण्याचीही प्रतिज्ञा त्या दोघांनी तेथेच घेतली आणि एका महिनाभराच्या अवधीत त्यांनी तुंगकू व सिंगकुओ ही दोन्ही शहरे जिंकून घेतली.

---

### झपाटलेली 'आई'

लाल सैन्याच्या या लढ्यामध्ये खेडुत स्त्रिया कशा हिरीरीने लढत, याच्या अनेक कम्युनिस्ट कथा प्रचारात आहेत. त्यांपैकी एक कथा अशी—

एका घुमश्चक्रीच्या लढाईत लाल सैन्याच्या वैद्यकीय पथकात एक खेडुत स्त्री काम करीत होती. धावपळीत तिला दिसले, की तिचा स्वतःचा मुलगा जखमी होऊन पडला आहे. शत्रूच्या गोळ्या त्याच्या आजूबाजूला पडत होत्या आणि तो विव्हळत होता, "आई...आई."

सारे भान हरपून शत्रूच्या बंदुकांतून येणाऱ्या गोळ्यांची पर्वा न करता ती सुसाट धावत सुटली. आणि आपल्या मुलाला कसे तरी ओढत ओढत तिने सुरक्षित स्थळी आणले. पण नंतर तिने मुलाच्या चेहऱ्याकडे पाहिले, तो तिचा मुलगा नव्हता. तो लाल सैन्याचा एक शूर सेनापती लीन पियाओ होता. माओ-त्से-तुंगचा वारसदार म्हणून ठरलेला तो हाच लीन पियाओ.

ती खेडुत स्त्री मात्र झपाटल्यासारखी झाली. सारे जखमी झालेले सैनिक तिला आपल्या मुलासारखेच दिसू लागले आणि वेड्याप्रमाणे ती त्यांच्या शुश्रूषेसाठी झटू लागली.

---

अशा अस्तित्वासाठी चालविलेल्या झगड्यामध्येच माओ–त्से–तुंग, चुह तेह आणि त्यांची लाल सेना गुंतली असताना त्यांच्याविषयीची अत्यंत थोडी आणि चुकीची माहिती शांघाय येथील चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या भूमिगत मध्यवर्ती शाखेला मिळत होती. या माहितीच्या आधारावरच शांघाय येथील कोमिन्टांनचे प्रतिनिधी मॉस्कोला बिनतारी संदेशात आपला अहवाल पाठवीत. या अहवालावर विसंबून मॉस्कोच्या कोमिन्टान सेंटरने आपल्या वृत्तपत्रात माओ–त्से–तुंग मेल्याबद्दल एक लांबलचक मृत्युलेख छापला होता. हा मृत्युलेख छापून आला तेव्हा माओने नुकतेच सिंगकुओ जिंकून घेतले होते.

## मध्यवर्ती समितीचे पोथीनिष्ठ आदेश

शांघायच्या मध्यवर्ती समितीची माओबद्दलची आणि त्याच्या लाल सैन्याबद्दलची मिळालेली माहिती जशी चुकीची होती, तसेच इतर शेतकऱ्यांच्या परिस्थितीबद्दल या समितीने बांधलेले आडाखेही चुकीचे होते. आणि या चुकीच्या आडाख्यांवरच चिनी कम्युनिस्ट पक्ष आपले धोरण आखीत होता. मध्यवर्ती समितीचा सेक्रेटरी जनरल ली ली सान याने याच वेळी ठिकठिकाणी लाल सैन्याने उभारलेले सोव्हिएट तळ आणि त्यांचे पुढारी यांच्याविरुद्ध प्रचारकी टीका करावयास सुरुवात केली. त्यांच्या मते—आणि त्यांचे मत कोमिन्टांनच्या सूचनेमुळे तयार झाले होते—जंगलांतील खेड्यांभोवती सोव्हिएटस् उभारून कम्युनिस्ट पक्षाचा काही फायदा होणारा नव्हता. सत्ता जर काबीज करावयाची असेल तर खेडी आणि शेतकरी यांच्यावर विसंबून राहण्याऐवजी मोठमोठी औद्योगिक शहरे जिंकून औद्योगिक कामगारांना हाताशी धरावयास हवे होते व सोव्हिएटस् स्थापून "चुकीच्या मार्गाने जाणाऱ्या" लाल पुढाऱ्यांना मोठ्या शहरांवर हल्ले करण्याचे आदेशही त्याने दिले होते. कम्युनिस्ट पक्षाचा या धोरणाला अविकृत पाठिंबा होता. 'प्रावदा' या सोव्हिएट पक्षाच्या मुखपत्रानेही हेच धोरण उचलून धरले होते व स्टालिनलाही ते पसंत होते. आणि त्यामुळे ली ली सानने औद्योगिक कामगारांना हाताशी धरण्याविषयी व मोठी औद्योगिक शहरे काबीज करण्याविषयी तगादा लावला होता. "खरी क्रांती शहरी औद्योगिक कामगारच करू शकतील, शेतकरी हे केवळ त्यांना मदत करू शकतील" असे मत कोमिन्टांननेही व्यक्त केले होते.

माओ-त्से-तुंग आणि चुह तेह यांनी मात्र मध्यवर्ती समितीच्या आदेशांकडे विशेष लक्ष न देता शांतपणे आपल्या सोव्हिएटचे क्षेत्र वाढविण्याचे कार्य पुढे चालू ठेवले होते. चिंगकाशानवर उरलेल्या लाल सैनिकांसह एकटचा पडलेल्या पेंग तेह हुईला मात्र हे आदेश धुडकावून देणे शक्य झाले नाही.

एप्रिल १९२९ मध्ये पेंग आपल्या सैन्यासह चिंगकाशान तळावरून खाली उत=

रला. आजूबाजूच्या शतकऱ्यांत लाल सैन्याविषयी सहानुभूती असल्यामुळे त्याची सैन्यसंख्या दहा हजारांपर्यंत वाढली होती. काही बंदुका, संगिनी आणि काही तोफा सैन्याजवळ होत्या. मध्यवर्ती समितीच्या आदेशाप्रमाणे पेंगने चांगशा या हुनानी राजधानीवर हल्ला केला. चांगशा हे शहर वास्तविक पाहता सुसंरक्षित होते. कोमिन्टांगचे ३०,००० सैनिक या शहरात होते. पण लाल सैन्याला दारूगोळ्याची व अन्नाची गरज होती. पेंगचे शेतकरी सैनिक जिद्दीने चांगशावर चालून गेले आणि एका दिवसात त्यांनी शहर काबीज केले. दहा दिवसपर्यंत त्यांचा शहरावर ताबा होता. पण शत्रूला अधिक सैनिकांची कुमक आल्याने कोमिन्टांगच्या मदतीला आलेल्या पाश्चात्य राष्ट्रांच्या लढाऊ जहाजांनी गोळीबार सुरू केल्याने पेंगला शहर सोडावे लागले. चांगशा सोडल्यानंतर पेंग माओ आणि चुहच्या सैन्याला येऊन मिळण्यासाठी कियांगसी प्रांताच्या रोखाने निघाला.

दरम्यान माओने साऱ्या सोव्हिएटस्‌चा कारभार पाहण्यासाठी दक्षिण कियांगसी भागात जुचिन नावाच्या एका लहानशा खेड्यात "मध्यवर्ती सोव्हिएट तळ" स्थापन केला होता. या तळाचे क्षेत्र हळूहळू वाढू लागले होते आणि त्यामध्ये दक्षिण कियांगसीमधील व फुकियेन प्रांताच्या पश्चिम भागातील कित्येक जिल्हे समाविष्ट झाले होते. फेब्रुवारी १९३८ मध्ये पहिले प्रांतिक सोव्हिएट सरकार जुचिन येथे स्थापन करण्यात आले. माओला या सरकारचा अध्यक्ष म्हणून व चुहला लाल सैन्याचा सर्वोच्च सेनापती म्हणून निवडण्यात आले.

## निर्मूलन मोहिमा !

हुनान प्रांताची राजधानी चांगशा हे शहर कम्युनिस्ट आणि कोमिन्टांग या दोघांनाही प्रतीकात्मक वाटत होते. चांगशा काबीज करणे म्हणजे साऱ्या चीनच्या विजयाची नांदी असे कम्युनिस्टांना वाटत होते, तर चांगशा ही आपल्या प्रतिकाराची पहिली फळी आहे असे चँग-कै-शेकला वाटत होते. त्यामुळे चँगने चांगशामध्ये आपले प्रचंड सैन्य मोठ्या तोफखान्यासह आणून ठेवले होते. चांगशापासून सारे सोव्हिएट तळ जवळ पडत होते. त्यामुळे कम्युनिस्टांना कायमचे नेस्तनाबूत करावयाचे असेल तर चांगशापासूनच सुरुवात केली पाहिजे, असे त्याला वाटत होते.

चांगशा शहर काबीज करण्याच्या इराद्याने शहराच्या आसपास घोटाळणारे लाल सैन्य शहरात चँग-कै-शेकची मोठी कुमक येताच लगेच कियांगसी प्रांतातील पाईन वृक्षांच्या जंगलात दडून बसले. परंतु या वेळी चांगशा शहरात येणारी कुमक फार मोठ्या प्रमाणात होती. प्रचंड सैन्य चांगशात दबा धरून बसले असल्याच्या बातम्या जुचिनमध्ये माओच्या हेरांकडून कळत होत्या. एवढे मोठे सैन्य शहराच्या संरक्षणाकरता लागणार नव्हते. खास चँगची या वेळी काही वेगळीच योजना

असली पाहिजे, हे स्पष्ट दिसत होते. येत्या हिवाळयात कोमिन्टांग सैन्य आपल्या साऱ्या शक्तिनिशी कोंडीत पकडून आपणावर हल्ला करणार हे लाल सैन्याने ताडले.

आणि हा तर्क खरा ठरला. चँग-कै-शेकची योजना मोठी होती. पुढील तीन वर्षात कम्युनिस्टांना संपूर्णपणे नेस्तनाबूत करण्याच्या उद्देशाने त्याने या सोव्हिएट तळांवर पाच वेळा प्रचंड शक्तीनिशी हल्ले केले. चिनी इतिहासात हे हल्ले (फाईव्ह अॅनिहिलेशन कँपेन्स) पाच निर्मूलन मोहिमा म्हणून प्रसिद्ध आहेत. ●

चिनी कम्युनिस्टांनी आता आपले पाय पक्के रोवले होते. ठिकठिकाणी त्यांनी आपली सोव्हिएट राज्ये उभारली होती. ती हळूहळू वाढत होती.

चँग-कै-शेकने या सोव्हिएट्सचा धोका वेळीच ओळखून त्यांना समूळ नाहीसे करण्यासाठी सारी शक्ती इरेस घातली.

त्यातूनच पुढे 'लाँग मार्च'चे महाभारत कसे घडले आणि पराकाष्ठेच्या झगडयानंतर या संघर्षात माओ-त्से-तुंगने चँग-कै-शेकवर कशी यशस्वी मात केली, हा रोमहर्षक कथाभाग दिवाळी अंकानंतर क्रमशः देण्यात येईल. —सं.

## पूर्वार्ध समाप्त : उत्तरार्ध दिवाळी अंकानंतर




*सिसेरो नाहीसा झाला होता. इकडे एलिझाचे चाळे वाढायला लागले होते मी सावध होतोच. परंतु एलिझा माझ्याहीपेक्षा सावध ठरली. तिचे काम होताच तिने आमच्या हातावर तुरी दिल्या. तिला पळून जायला मी फूस दिल्याचा माझ्यावर आरोप ठेवून बर्लिनकडून मला बोलावणे आले. आमचे सर्व नेते, आणि ते कॉन्सट्रेशन कॅम्प्स माझ्यामोवती गरागरा फिरताहेतसे मला वाटायला लागले......*

**एल्. सी. मोझिस**

अनुवाद : **अशोक खरे**

लेखांक : सहावा

काय करावे सुचत नव्हते. बर्लिनला गेल्यावर माझी काय वाट होणार, ते मला समजले होते. तिच्या फितुरीमागे माझा हात नाही, हे मी कसे सिद्ध करणार ? आणि बर्लिनला गेलो नाही तर अपराध मीच केला हे समजण्यासारखे होते.

इस्तंबूलला मी अनेक तास भटकत होतो. कोणीतरी मित्र भेटेल व काहीतरी मार्ग सापडेल, म्हणून मी प्रयत्न केला. याच वेळी नेमके सगळे नाहीसे झाले. तात्पुरता तोडगा म्हणून मी बर्लिनला टेलिग्रॅम केला की, मी अतिशय आजारी आहे; डॉक्टरनी मला फिरण्यास मनाई केली आहे.

मी हॉटेलात परतलो. थंडगार पाण्याने स्नान केले व स्नानगृहातून बाहेर येतो तोच फोन खणखणला. तसाच ओलेता मी फोन घेतला.

"मी ब्रिटिशांच्यावतीने बोलत आहे. तू बर्लिनला जाताच तुला ठार मारणार, त्यापेक्षा तू आम्हांला सामील हो व बायकापोरांचे प्राण वाचव."

"त्रिवार अशक्य" मी ठणकावले.

मला झोपेची फार आवश्यकता होती तरी विचारचक्रामुळे झोप येत नव्हती. मी पोषाख केला व बूट घालणार तोच पुन्हा फोन आला, "तू जे करण्याचे योजत आहेस, ते मूर्खपणाचे आहे. ब्रिटिशांना येऊन सामील हो. ते फार मोठे मानवतावादी आहेत. त्याबद्दल तू श्री...यांना भेट."

जर्मन लोकांपेक्षा शत्रू माझ्याशी फारच दयाळूपणे वागत होता. आता जर्मनी-माझी पितृभू-मला पारखी होणार. जर्मनी म्हणजे मृत्यू व ब्रिटन म्हणजे...... नाही... काय बोललो मी ! इतका मी कृतघ्न कसा ? माझे प्राण वाचवण्यासाठी मी देशप्रेमाचा बळी देऊ ! नाही, शक्य नाही.

काही वेळ गेला. पुन्हा फोन आला.

"डॉ. पी बोलत आहे. लक्षपूर्वक ऐक. ही शेवटची सूचना आहे. तुझे कर्तव्य बजावण्यात तू ज्या गोष्टी केल्यास त्याच्या परिणामांबद्दल तुला भीती वाटायला नको. ब्रिटिशांना माहीत आहे, की तू फार हुशार आहेस. तू फक्त हुकमांची तामिली केलीस. आज रात्री आपली भेट होईल."

"ते मी करू शकत नाही. त्यास वैयक्तिक अशी कारणे आहेत. माझे कुटुंब जर्मनीत आहे. शिवाय बोट बुडण्याच्या बेतात असताना पळून जाण्यात काय हशील ? . . . नाही, मला ते शक्य नाही. समजले काय ?"

"अर्थात् मी जाणतो. परंतु तुझ्या भविष्याबद्दल जरा विचार कर. तुझ्या मुलाबाळांचा विचार कर. जर्मनी युद्ध हरली तर तुला अगदी थोडचा अपराधाबद्दल दोषी धरण्यात येईल."

"ते मला शक्य नाही. आभारी आहे."

मी फोन खाली ठेवला व खाली धावतच आलो. हॉटेलच्या मधल्या आवारात आलो. दोन व्यक्ती माझ्याकडे टक लावून पाहत होत्या. मी मॅनेजरकडे जाऊन 'यापुढे मला कोणतेही फोन येता काम नयेत' असे सांगितले व तिच्या हातांवर दहा पौंड ठेवले.

मी पुन्हा खोलीत आलो व कपडे काढणार तोच फोन घणघणला. त्याच चोरांचे

हे कारस्थान.

"तू बर्लिनला गेलास म्हणजे संपलासच. अजूनही विचार करण्यास अवधी आहे." आवाज आला.

आता मात्र मी संतापलो व सुरीने फोनची तार कापली. आता मी शांतपणे झोपू शकत होतो. अर्थात् पुढे काय या घोर चिंतेने, लागावी तशी झोप लागत नव्हती.

दुसरे दिवशी ते विमान मला न नेताच बर्लिनला गेले व त्याच रात्री मी अंकाराला आलो. अंकारात एलिझाच्या पलायनाचा विषय सर्वांच्या तोंडी होता.

मी घरी जातो तोच दारावर थाप पडली. दार उघडले तो विलक्षण माणूस माझ्या पुढ्यात उभा होता. ज्याचे आमच्या वकिलाने बारसे केले तो सिसेरो आमच्यासमोर होता. तो म्हणाला,

"एलिझा ब्रिटिशांकडे आहे व अजूनही अंकारात आहे. तुझ्याकडे फोटो व्यवस्थित आहेत ना?"

"घाबरू नकोस सर्व फोटो सुरक्षित आहेत." मी त्याला धीर दिला.

तो जाण्यास निघाला. जाता जाता म्हणाला, "शक्यतो अंकारा सोडून जा." तो भीतीने अजूनही थरथरत होता. चेहरा पांढराफटक पडला होता. त्याचा श्वासोच्छ्वास जोराने चालत असल्याचे स्पष्ट दिसत होते. त्याचा आवाजही खोल गेला होता. प्रथमच त्याने हात पुढे केला. माझा हात दाबून तो निघाला. अंधारात गुप्त झाला. कधीच न भेटण्यासाठी तो निघाला.

ऑफिसात मी अजूनही जात नव्हतो. विचार करून करून मी इतका थकलो की पॅपेननी मला बळजबरीने विश्रांती घेण्यास सांगितले. आरशात पाहिले तो चेहऱ्यात कमालीचा फरक झालेला आढळला. वृद्धावस्थेची लक्षणेही दिसू लागली.

अजूनही बर्लिनहून काही समजले नाही. करीत असतील माझ्या आयुष्याचा जमाखर्च. माझ्या खास विनंतीवरून एलिझाची सोफियाहून अंकाराला बदली झाली व तिच्या खाजगी आयुष्यात न डोकावल्यामुळे तिला ब्रिटिशांना जाऊन मिळणे सुलभ झाले, हा त्यांच्या मते माझा सर्वांत मोठा अपराध. तसेच पॅपेनला मी साथ दिली, प्रसंगी बर्लिनच्या आज्ञा उल्लंघून. अर्थात् हे काल्टेन् ब्रुनर व रिबेन्ट्रॉप यांना पटायचे कसे? ही झाली माझी खर्चाची बाजू.

माझी जमेची बाजू म्हणजे इतकी वर्षे केलेली नोकरी. तिला बर्लिनच्या मते काहीच किंमत नाही.

माझा जमाखर्च पूर्ण झाला. पण तो तुटीचा होता व तूट भरून निघण्यासाठी फक्त माझा मृत्यू आणि मृत्यू.

दोन आठवडे झाले. मी ऑफिसात जाऊ लागलो. तेव्हा सर्वजण माझ्याकडे कुतूहलाने पाहत होते. सर्वप्रथम मी फोटो व महत्त्वाचे कागदपत्र पाहिले. सुदैवी मी. सर्व काही सुरक्षित होते. त्याच वेळी जपानी वकिलाकडून पार्टीला बोलावल्याचे समजले.

संध्याकाळी मी पत्नीसह पार्टीला गलो. माझे इतर सहकारीही आले होते. बॉल डान्सचा कार्यक्रम चालू होता. संगीत चालू होते. इतक्यात मला कोणीतरी फोनवर बोलावत असल्याचे समजले. मी तत्काळ फोनकडे गेलो.

" साहेब, ताबडतोब घरी निघून या. एक अनोळखी इसम आला आहे. तो कोण आहे ते तो सांगत नाही. " आमची मोलकरीण बोलत होती.

पत्नीला न घेताच मी तडक घरी निघालो. कसले ताट वाढून ठेवले आहे आमच्यापुढे ! मी धाडकन् दार उघडले. समोरच कोचावर एक इसम बसला होता. त्याने बोलण्यास सुरुवात केली,

" अशा वेळी तुमच्या आनंदात विरजण घातल्याबद्दल क्षमस्व. परंतु जे काही मी सांगणार आहे ते महत्त्वाचे आहे. बर्लिनमध्ये तुला काडीचीही किंमत नाही. तुझे प्राण वाचवण्याची ही शेवटची संधी आहे. मी तुला ' फितुर हो ' असे सांगत नाही. आमच्या ब्रिटिश वकिलातीतील काही अधिकाऱ्यांना भेट. "

" मरण आले तरी बेहेत्तर पण मी फितुर होणार नाही. तुम्ही चालते व्हा. "

" धन्य आहे देशप्रेमाची. मला वाटले होते तुझे मन मी वळवू शकेन. पण ते शक्य झाले नाही. "

अशा तऱ्हेने त्याला वाटेला लावले. तोच बर्लिनहून एक पत्र आले, " तुम्हाला असे कळवण्यात येते, की तुमच्या सेक्रेटरीला पळून जाण्याबाबत तुम्हीच मदत केली आहे. सहा एप्रिलपासून चौकशी सुरू होईल. "

आता माझे भविष्य ठरल्यासारखेच होते. माझ्या डोक्यावर आता इतका परिणाम झाला होता, की जरा मोकळ्या हवेत फिरावयास निघालो. अगदी दूर दूर शहरी जीवन सोडून. निसर्गाच्या कुशीत. पक्ष्यांच्या संगीतात. मी भटकत होतो. वेड्यासारखा भटकत होतो. निसर्गाची ती भव्यता पाहून मन कसे अगदी शांत झाले. परंतु माझ्या पत्नीसाठी, मुलांसाठी मला घरी येणे भाग होते.

खरे पाहता ' ऑपरेशन सिसेरो ' चा येथेच शेवट होतो. लवकरच युद्धाने शेवटच्या महाप्रलयंकारी अवस्थेत प्रवेश केला. वाटाघाटींचे दरवाजे केव्हाच बंद झाले होते. मे १९४४ नंतर आमचा राजनैतिक व मुत्सद्देगिरीच्या आघाडीवर पराभव झाला.

वाचकांना पुढे प्रमुख व्यक्तींचे काय झाले हे जाणण्याची उत्सुकता लागली असेल.

टर्की-जर्मन संबंध तुटल्यापासून माझी अवस्था फार बिकट झाली होती. मे १९४४ मध्ये टर्कीने दोस्तांबरोबर तह केला. याच काळात जर्मनीला जाण्याचे मी युक्त्याप्रयुक्त्या लढवून पुढे ढकलत होतो.

मेपासून ऑगस्टपर्यंत तेथील (अंकारातील) जर्मनांना इतरत्र हलवण्यात इतर अधिकाऱ्यांबरोबर मग्न होतो. तुर्कांनी आम्हांला ऑगस्टच्या शेवटपर्यंत–सर्व जर्मनांना–हलवण्यास सांगितले होते.

५ मे १९४४ ला पॅपेननी अंकारा सोडले. पाठोपाठ इतर जर्मनांना पाठवण्यात आले. मी शेवटच्या बॅचने बर्लिनला जाण्याचे ठरवले. परंतु दुर्दैव का सुदैव काहीही असो, माझे जाणे लांबले. कारण मधील प्रदेशावर रशियन लाल सेनेने प्रभुत्व मिळवले होते.

ऑगस्ट संपला. मी व माझे कुटुंब युद्धकैदी ठरलो. तसेच इतर अधिकारीही. आम्हांला वकिलातीतच राहण्यास सांगितले. पण फरक इतकाच की आता आम्ही सैनिकांनी वेढलो गेलो होतो.

या ना त्या कारणाने एप्रिल १९४५ पर्यंत मी बर्लिनला जाऊ शकलो नाही. तोपर्यंत ते प्रचंड व्यक्तिमत्त्व हेर हिटलर या जगातून नाहीसे झाले होते व जर्मन-सत्ता शेवटच्या घटका मोजीत होती.

आमच्यापैकी काहींना पुढे ब्रिटनमध्ये युद्धकैदी म्हणून नेण्यात आले व काहींना ब्रिटनव्याप्त जर्मनीत नेण्यात आले. तोपर्यंत युद्ध संपले होते. नंतर अनेक जर्मन नेत्यांना न्युरेम्बर्ग कोर्टात खेचण्यात आले. त्यात मीही होतो. पण माझ्यावरील कोणताही आरोप सिद्ध होऊ शकला नाही. अगदी धुतल्या तांदळासारखा मी बाहेर आलो. मला व्हिएन्नात पाठवण्यात आले व पुन्हा मी, पत्नी व मुले यांचे मीलन झाले. सध्या मी इन्सब्रुकला असतो. तेथे मी कापडगिरणीचा मॅनेजर आहे.

रिबेन्ट्रॉप व काल्टेन्ब्रुनर यांना फाशीची शिक्षा झाली. हेर फॉन पॅपेनही संपूर्णतः निर्दोष ठरवले गेले.

एलिझाचे पुढे काय झाले ते समजले नाही. ती पळून गेल्यानंतर मी तिला एकदाच पाहिले पण काही बोलू शकलो नाही. अजूनही तिच्या आईवडिलांना तिचा पत्ता नाही.

आमच्या शेवटच्या मुलाखतीनंतर सिसेरो जो अदृश्य झाला तो कायमचाच. कदाचित् त्याला अटकही झाली असेल. निसटला असला तरी तो श्रीमंती जीवन जगू शकणार नाही. कारण जर्मनांकडून मिळालेल्या पैशांपैकी नव्वद टक्के पैसे खोटे होते. ज्याने टुमदार बंगला बांधण्याचे आराखडे बांधले होते, त्याला आता झोपडीवरच समाधान मानावे लागेल. आमच्याकडून जे पैसे त्याला मिळाले ते सगळे काल्टेन्ब्रुनरच्या फोर्जरी खात्यात बनवले होते व इतके अस्सल की बऱ्याच बँकांचे मॅनेजरही फसले.

सिसेरोने ब्रिटिश वकिलातीतील जमाखर्चाचे फोटो दिले तरी ते बर्लिनने का स्वीकारले त्याचे कारण काल्टेन्ब्रुनरच्या या फोर्जरी धंद्यात आढळते. सिसेरोने दिलेली फिल्म किंमतशून्य व आम्ही दिलेले पैसेही किंमतशून्य.

'ऑपरेशन सिसेरो'ला इतिहासाच्या दृष्टिकोनातून फारच महत्त्व आहे. इतिहासात प्रथमच एका गुप्त हेराने फिल्म रोलसाठी इतकी प्रचंड रक्कम मागितली. त्याने दिलेली माहिती अचूक असूनही तिचा काहीच उपयोग करण्यात आला नाही

हा दुसरा विशेष. या माहितीपासून जर्मन नेते एवढेच शिकले की, जर्मनी युद्ध हरणार. स्वप्नीही पाहिले नाही ते सत्य सृष्टीत उतरणार. हा चार महिन्यांचा काळ म्हणजे जर्मनीच्या कसोटीचा काळ. भरती संपली व याच अवधीत वैभवाच्या ओहोटीस आरंभ झाला. अंतकाळ समीप आला. पण हे कटू सत्य बर्लिनला पचवता आले नाही. त्यासाठी त्यांनी अनेक निरपराधांना कंठस्नान घातले.

नाझी नेत्यांचा सर्वांत मोठा दोष म्हणजे जगाचे खरे स्वरूप व सत्यस्थिती जाणून घेण्यात त्यांनी अक्षम्य नाखुषी दाखवली. ते नेहमीच कल्पनातरंगात राहिले. इमारत कोसळत होती. पाया खचत होता तरीही तिला सावरण्याचा त्यांनी प्रयत्न केला नाही.

काहीही असो. हे युद्ध अनेक दृष्टींनी संस्मरणीय ठरेल. याच युद्धात इतक्या थोडचांच्या मर्जीखातर इतकी प्रचंड लोकसंख्या धोक्यात आली. एकाच विलक्षण विचाराने झपाटलेला माणूस काय करू शकतो याचे हे उत्तम उदाहरण. इच्छाशक्तीच्या जोरावर इकडचे जग तिकडे कसे गेले जाते त्याचा हा जिवंत इतिहास. बुद्धीचा अचाट पराक्रम, अमानुषतेचा कळस यांनी भरलेले हे तुंबळ युद्ध.

ते दिवस आठवले की अजूनही अंग शहारते. अजूनही गेस्टापोंचे ते संचलन माझ्या कानांत घुमत आहे व कान बधीर होत आहेत. डोके सुन्न होते. पण त्याच वेळी सिसेरोने दिलेली माहिती वापरली गेली असती तर! जाऊ दे. उगाच कशाला स्वप्न रंगवा. आता आम्हांला शांतता पाहिजे. अर्थात ती प्रतिष्ठेचा बळी देऊन खासच नाही. मग हाच जर्मनी येत्या दहा वर्षांत नव्या जोमाने चमकताना दिसेल. पण तरीही जर्मन त्या हुतात्म्यांचे पवाडे गातील व म्हणतील, 'दिव्यत्वाची जेथे प्रचिति तेथ कर माझे जुळती.'

## समाप्त

# मोहक मनोगते

एका समर्थ लेखकाची ही ' मनोगते ' आहेत. ' मनोगते ' हाच शब्द या लिखाणाला योग्य आहे. चपखल आहे. माँटेन या आद्य फ्रेंच निबंधकाराच्या लिखाणाचे स्वरूप १५७१ मध्येही असेच होते. किंबहुना इंग्रजी निबंधाचा जन्मच ललित-वाङ्मयाचा एक प्रकार म्हणून झालेला आहे. आपल्याकडे मराठीत निबंध जन्मला तो डोक्यावर कोणत्या ना कोणत्या कार्याचे ओझे घेऊन. समाजसुधारणा, राजकीय असंतोष अशी महत्त्वाची कामे आपल्या निबंधकारांच्या डोळ्यांपुढे होती. त्यामुळे उपदेश, लोकजागृती, वादप्रतिवाद ही जाडजाड भिंगे आपल्या निबंधाने सुरुवातीपासूनच वापरली. फडक्यांच्या 'गुजगोष्टीं'नी आणि काणेकरांच्या 'लघुनिबंधां'नी मात्र मराठी निबंधाला गार्डिनर, मॅक्स् बीरबोम्, ल्यूकस् यांच्याजवळ पोचविले. कलाविलास, आत्मनिष्ठा ही नवी लेणी त्यावर चढवली. याच परंपरेतली ही 'मनोगते.' वाचकांशी दिलखुलास गप्पा करणारी. मॉंटेनच्या लेखनपद्धतीचे वर्णन करताना नेहमी म्हटले जाते की, चार मंडळी शेकोटीभोवती बसली असता हा गृहस्थ त्यांच्याशी शिळोप्याच्या गप्पा छाटीत असल्याचा भास त्याचे निबंध वाचताना होतो. घाटयांच्या ' मनोगतां 'त याच्यापेक्षाही जास्त जवळीक आहे. किंबहुना ते अर्धवट स्वत:शी आणि अर्धवट दुसऱ्याशी असे बोलतात. मनात उठणारे विविध विचारतरंग, भावलहरी, सारे जसेच्या तसे मूळच्या स्वरूपात मांडण्याचा प्रयत्न करतात. म्हणून ही ' मनोगते. '

मनात उठणाऱ्या विविध लहरींप्रमाणे अर्थातच ही मनोगते विविधतेने नटलेली आहेत. लघुनिबंधाच्या वा गुजगोष्टीच्या स्वरूपाचे लिखाण तर यात आहेच, पण शिवाय यातील काही मनोगते व्यक्तिगत आत्मनिष्ठ भावकाव्याचे सुंदर नमुने आहेत. स्वत:विषयी काही गोष्टी मोकळेपणाने सांगितल्या आहेत, तशाच दुसऱ्यांच्या काही गोष्टींवर आवर्जून लिखाण केले आहे. मनात येणारे निर्भर विचारतरंग आहेत, त्यातूनच कधी एखाद्या तत्त्वाचे मनोहर दर्शन घडते तर कधी काही विशिष्ट गोष्टींवर, विचारांवर, मतप्रणालींवर रोखठोक आणि परखड चर्चा होते. काही ठिकाणी केवळ एखाद्या प्रसंगातून, तर कधी नुसत्या संवादातून घाटे आपली मनोगते व्यक्त करतात.

' कॅशिया मरारला ' आणि ' बाहेरचा ' ही खरोखर उत्कृष्ट आत्मनिष्ठ भावकाव्ये आहेत. विशिष्ट भावनेचा उत्कट आविष्कार हे त्यांचे वैशिष्टच आहे.

विशेषत: ' बाहेरचा ' या मनोगतातील विरक्तपणा, जीवनाशी संलग्न झालेला एकेक धागा तुटताना पाहून विशेष मोहक वाटतो. "...मुक्काम जवळ जवळ येत आहे. प्रवाह वाहत आहे. अरुंद झाला आहे. पण खोल ोत चालला आहे. प्रवाहाबरोबर मी वाहत आहे. प्रतिकार करीत नाही. सहकारही देत नाही. क्वचित् प्रसंगी हात मारतो. वास्तविक त्याची गरज नसते. परंतु तेवढेच कर्तृत्वाचे समाधान लाभते. प्रवाह मुक्कामाकडे आपल्या वेगाने मला नेत आहे. मी वाहतो. " हे शेवटच्या मन:-स्थितीचे वर्णन वाचून पैलतीरी नजर लावून बसलेले घाटे दिसू लागतात. त्या नजरेत तुटकपणा नाही, पण पलीकडची ओढ आहे. शोक नाही, पण संबंध संपत आल्याची जाणीव आहे. तृप्त, शांत असली तरी ही नजर विलक्षण बोलकी आहे. संसारात गुंतलेल्या, हर्षविमर्षांचे डाव मांडणाऱ्या आपल्या गॉगलवाल्या नजरांना व्यथित करणारी ती नजर आहे. आऊटसायडरची नजर आहे. संयमित भावनेच्या तीव्र आविष्काराची ही सुंदर उदाहरणे आहेत.

' मी टोपी टाकली ' आणि ' अनादरो भवति ' यांसारख्या मनोगतांत ही जादू नाही. ते जणू आत्मचरित्रातले तुकडे आहेत. संपूर्णपणे व्यक्तिगत आहेत. कुणाच्याही भावनेला आवाहन करील असे सामान्यीकरणाचे सामर्थ्य त्यांच्यात नाही.

## वैचारिक चर्चा

मनोगतांची ही एक बाजू झाली. ही आत्मनिष्ठेची, भावनेची बाजू आहे. दुसऱ्या बाजूला ' मोठेपणाची चिरफाड, ' ' His humility was insulting,' ' पण-तरी-पण,' ' भारतात धर्मयुद्धे का झाली नाहीत, ' ' महाराष्ट्राचे मन ' यांसारख्या वैचारिक चर्चा आहेत. त्यांची बैठक विचारशील, चिकित्सक आहे. भावनेपेक्षा बुद्धीवर आधारलेली आहे. आपल्याला पटलेले, आवडलेले विचार घाटयांनी येथे मांडले आहेत. यातले काही विचार नवीन आहेत. रूढ कल्पनेला धक्का देणारे आहेत. पण घाटयांनी प्रामाणिकपणे त्यांचा पाठपुरावा केला आहे. " आपण आपल्या इतिहासाकडे बऱ्याचशा अद्‌भुतरम्य वृत्तीने आणि इच्छापूर्तीच्या दृष्टीने पाहत असतो. सत्यापेक्षा प्रतिष्ठेकडे आपले विशेष लक्ष असते. इतिहासात आपल्या पूर्वजांनी केलेल्या चुका आपल्याला दिसत नाहीत... परचक्र यावे आणि त्याच्यापुढे आम्ही हार खावी असाच आमचा आजवरचा इतिहास आहे... आमचा इतिहास हा पराभूतांचा इतिहास आहे; हे सत्य कटू असेल तरी आम्ही कबूल केले पाहिजे. आणि शहाणपणाने नवे धडे घेतले पाहिजेत. " यासारखी रोखठोक चर्चा घाटयांच्या स्वतंत्र चिंतनशीलतेचा प्रत्यय घडविते. त्यातून ठामपणे काही सिद्धांत मांडले जातात. " आमचा धर्म आमच्या बुद्धीत स्थिर झाला. खाली हृदयात उतरला नाही. अवश्यमेव आणि एकमेव असा जीवनमार्ग झाला नाही. " " आम्ही हमेशा उदार होतो. कारण हमेशा उदास होतो. आमचे औदार्य आमच्या

इच्छाशक्तीतून आणि विवेकातून प्रकट झाले नाही. आमच्या बेजबाबदार आळसातून बाहेर पडले. " यांसारखे घाटचांनी लिहिलेले काही विचार म्हणजे परखड आत्मपरीक्षणाचा नमुना आहे. 'महाराष्ट्राच्या मना 'ची घाट्यांनी केलेली चिकित्सा लक्ष्यणीय आहे. मराठी मनाचा आगळा अहंभाव, त्याची दारिद्र्याची मिरास, त्याचा गैरहिशेबीपणा, त्याचा रोखठोकपणा आणि रांगडेपणा या साऱ्यांचे त्यांनी आपुलकीन् आणि जिव्हाळ्याने वर्णन केले आहे. त्याच्या दोषांवरही प्रेम केले आहे. कारण ते त्यांचे मन आहे. ( आणि खरोखरीच याच प्रकारच्या मनाची ही 'मनोगते' नाहीत का ? ).

रोखठोकपणा हा मराठी मनाचा गुण आहे. घाटचांच्या शैलीचाही तो गुण आहे. पण नकळत कधीकधी हे अती होते आणि मतभेदाला जागा करून देते. 'मोठेपणाची चिरफाड' या 'मनोगता 'त घाटचांनी एक चांगला मुद्दा मांडला आहे. एखाद्या फार मोठ्या व्यक्तीचे मोठेपण हे स्वयंभू असते. त्याचे मोजमाप घेताना त्याच्या मोठेपणाच्या निर्मितीत कुणाकुणाचा कायकाय वाटा होता याची चिरफाड करू नय, इथपर्यंत ठीक. पण या दृष्टीने शिवाजी महाराजांच्या मोठेपणाची चर्चा करताना घाटे लिहितात, " एका फार मोठ्या माणसाची आई यापलीकडे जिजाबाईसाहेबांना इतिहासात महत्त्व नाही. . . जिजाबाईसाहेबांनी महाराजांसाठी नक्की काय केले ? इतिहासात काहीच पुरावा नाही. त्यांनी महाराजांना जन्म दिला, वाढवले, लहानपणी आपत्काळी सांभाळले. साऱ्या आया आजवर हेच करीत आल्या आहेत . . . जिजाबाईसाहेबांनी आपले तेज प्रकट करण्यासाठी मुलाला स्वराज्याची दीक्षा दिली असेल, असे मानण्याचा मोह होतो. जिजाबाईंच्या दृष्टीने नवऱ्याला दिलेली ती एक व्हिकेरियस पनिशमेंट होती, असा तर्क करण्याचाही मोह होतो. परंतु इतिहासाला सत्य हवे असते; तेथे मोहाला स्थान नसते. एवढे निःसंशय म्हणता येईल, जिजाबाईसाहेब कधी आड आल्या नाहीत. त्या कोवळ्या रोपाला त्यांनी खतपाणीच घातले असेल. "

हे थोडे अती झाले आहे. चांगला मुद्दा पटविण्याच्या भरात तपशील ताणला गेला आहे. जिजाबाईसाहेबांनी महाराजांसाठी जे काही केले, त्याला परिस्थितीच्या स्वतःच्या संदर्भात महत्त्व आहे. जिजाबाईसाहेबांनी महाराजांच्या मनात काहीच नसताना स्वतःच्या इच्छेने ठरवून, योजनापूर्वक त्यांचे मन स्वराज्यप्राप्तीसाठी उद्युक्त केले, असे कोणीच म्हणत नाही. पण जी काही तेजाची, स्वतंत्रतेची ठिणगी या बालस्वभावात दृष्टीला पडली ती त्यांनी फुलविली, जोपासली, तिची ज्वाला बनविली. त्यातूनच पुढे यज्ञाचे स्थंडिल धगधगले. आईलाच हे काम करावे लागते. आणि महाराजांच्या आईने ते केले असले पाहिजे. याला प्रत्यक्ष इतिहासाचा पुरावा लागत नाही. तसा तो असही शकत नाही. पण हा साधा सारासार विचार आहे. खानदानात जन्मलेल्या आणि परिस्थितीचे चटके बसलेल्या त्या तेजस्विनीला हे करणे प्राप्तच होते. कोणत्याही

कार्याला जाण्यापूर्वी महाराज मॉसाहेबांची अनुज्ञा घेत असत, याचे उल्लेख बखरींतून, पोवाड्यांतून ठिकठिकाणी आहेत. महाराजांच्या राजकारणापासून आईसाहेब अलिप्त नव्हत्या हे दाखविण्यास ते पुरेसे आहेत. महाराजांच्या मोठेपणाची चिरफाड न करण्याच्या नादात घाटयांनी त्या तेजस्विनीवर अन्याय केला आहे.

## शिव-समर्थ संबंध

समर्थांवर त्यांनी असाच अन्याय केला आहे. शिवसमर्थ भेट १६७२ त झाली की, तत्पूर्वी झाली हा अद्याप वादाचा मुद्दा आहे. घाटयांनी ती १६७२ त झाली असे दाखविणारे पुरावेच फक्त गृहीत धरले आहेत. समर्थशिष्याच्या पत्रातील ' राजे यांची ही पहिलीच भेट आहे ' हे शब्द मुळात ' राजे यांची भेट पहिलीच आहे ' असे आहेत. ( ' ही ' शब्द घाटयांचा. ) त्याचा अन्वय लावताना काही विद्वानांनी ' ते होय हंसगमना पहिलीच आहे ' ( पूर्वीचीच आहे ) या रघुनाथपंडिताच्या ओळीचा आधार घेऊन ' राजे यांची भेट पूर्वीचीच आहे ' असा अन्वय लावल्याचे घाटयांनी दिलेले नाही. ' एखाद्या संस्थेला भेट देण ' हा वाक्प्रचार 'To pay visit to an institution' चे सरळ भाषांतर आहे.सतराव्या शतकात हा वाक्प्रचार नव्हता असा युक्तिवाद घाटे करतात व त्या जोरावर आपण राजवाड्यांना गप्प बसविल्याचे सांगतात. पण हा वाक्प्रचार सतराव्या शतकातच काय, तत्पूर्वीही अस्तित्वात होता. महानुभावी वाङ्मयात ऋद्धिपूर वगैरे ठिकाणच्या मठांना भेट दिल्याचे कितीतरी उल्लेख आहेत. कर्मवीर आणि कवी एकत्र आले असता कोणाचा प्रभाव कोणावर पडेल, असा हास्यास्पद मुद्दा घाटे मांडतात. कुणाचा तरी प्रभाव कोणावर तरी पडण्यासाठी एकजण निष्क्रिय असावा लागतो. निदान दुसऱ्यापेक्षा कमी तेजस्वी असावा लागतो. इथे दोन महान विभूतींचा संकर झाला आहे. दोघांनी स्वतंत्रपणे जे अनुभवले त्यातून तयार झालेल्या तेजस्वी विचारांची देवाणघेवाण झालीच असेल. समर्थांच्या निर्याणानंतर काही वर्षांतच लिहिलेल्या गिरिधरस्वामीकृत समर्थप्रतापातील उल्लेख लक्ष्यणीय आहेत.

१. शिवराजास वृत्तांत कर्णोपकर्ण गेले ।
दर्शनासाठी डोंगरोडोंगर फिरो लागले ।
समर्थदर्शन होय ना उदास झाले ।
राजकार्य काही सुचेचिना ।।

२. समर्थआज्ञा राजा मानी मोठी ।
शिवराज तेणें बळावला ।।

३. समर्थांचा प्रतिवर्षी शकुन घेती ।
विजयादशमीसि दर्शनासि येती ।
ज्याचा अभ्युदय त्याच्या अश्वावरी ।

स्वार होती ।
भोंवते चालते सरदार ।।

खुद्द शिवाजी महाराजांनी समर्थांना जी ' सनद ' दिली, ती तर अस्सल नाही असे आजवर कुणी म्हटलेले नाही. त्यात महाराज म्हणतात, " मजवर कृपा करूनु सनाथ केले. आज्ञा केली की तुमचा मुख्य धर्म राज्यसाधन करून धर्मस्थापना, देवब्राह्मणांची सेवा, प्रजेची पीडा दूर करूनु पाळण रक्षण करावे; हें व्रत संपादून त्यांत परमार्थ करावा. त्याजवरून जो जो उद्योग केला व दुष्ट तुरुक लोकांचा नाश करावा, विपुल द्रव्ये करूनु राज्यपरंपरा अक्षई चालेल ऐसीं स्थळें दुर्घट करावीं ऐसें जें जें मनीं धरिलें तें तें स्वामींनी आशीर्वादप्रतापें मनोरथ पूर्ण केले. "

असो. महाराजांचे मोठेपण हा त्यांचें स्वत:चे व्यक्तित्व आणि परिस्थितिजन्य गोष्टी यांचा संकलित परिणाम होता. त्याची चिरफाड करू नये, हे ठीक. पण म्हणून इतर गोष्टींचे महत्त्व नाकारूनही चालणार नाही.

घाटयांच्या ' मनोगतां 'त विवाद्यता आढळली ती फक्त या एकाच ठिकाणी. बाकी सर्वत्र दिलखुलास मोकळी चर्चा आणि सूक्ष्म वेधक विश्लेषणच नजरेस पडते. ' His humility was insulting ' यांसारख्या मनोगतात एखाद्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचे धागे सोडवीत जाण्याची त्यांची लकब फार मनोहर आहे.

घाटयांची भाषाशैली फारच मोहक आहे. छोटी छोटी वाक्ये ते अशा दिमाखाने लिहीत जातात की त्यात डौल, निश्चितता आणि परिणामकारकता येतेच, पण गोड जिव्हाळाही त्यांमध्ये आपोआप अवतरतो, घाटयांचे खरेखुरे मनोगत स्पष्ट करतो.

अशी ही मनोगते. आपुलकीने वाचकाजवळ उघड केलेली. स्वत:विषयी अणि स्वत:च्या विचारांविषयी नि:संकोच आणि मोहक चर्चा करणारी. कविमनाचे घाटे, तत्त्वज्ञ घाटे, विचारवंत घाटे, अशी घाटयांची विविध मनोहर रूपे दाखविणारी आणि शेवटी त्यांची ती अज्ञाताकडे वळलेली स्थिर, अलिप्त, आऊटसायडरची नजर दाखविणारी.

मनावर चिरकालिक ठसा उमटविण्याचे सामर्थ्य या ' मनोगतां 'त आहे.

( ' मनोगते ' – वि. द. घाटे : मौज प्रकाशन: किंमत चार रुपये : पृष्ठे १४० )

## २ : सर्व अपेक्षा पुऱ्या करणारे शास्त्रीय पुस्तक

एखाद्या भाषेची सर्वांगीण समृद्धी व्हावयाची असेल तर केवळ ललित साहित्याचा अथवा वैचारिक वाङमयाचा विकास होऊन भागत नाही. आजचे युग विज्ञानाचे आहे. मानवतेच्या नौकेचे सुकाणूच आज विज्ञानाच्या हातात आहे. विज्ञानाच्या

क्षेत्रात जे जे काही महत्त्वाचे घडेल त्याचे पडसाद मानवी जीवनात उठणे अपरिहार्य आहे. म्हणूनच समृद्ध भाषेला ललित आणि विचारप्रवर्तक वाङ्मयाबरोबरच विज्ञानाच्याही अंतरंगात शिरले पाहिजे. ते आत्मसात् केले पाहिजे. ते तिला पेलता आले पाहिजे.

मराठीच्या समृद्धीच्या मार्गात हीच उणीव आजवर प्रकर्षाने भासत आलेली आहे. मुक्तेश्वर–ज्ञानेश्वरांनी तिची जडणघडण कलापूर्ण करून शिवाय तिच्यात चैतन्य निर्माण केले. तिचे व्यक्तिमत्त्व घडविलेल्या व्यक्तिमत्त्वाची जोपासना आजवर कित्येकांनी केली. तिला भारदस्त, मोहक, आकर्षक रूप दिले. पण त्या व्यक्तिमत्त्वाला पूर्णत्व आले नाही. शास्त्रीय विवेचनात मराठीने अजून प्रावीण्य मिळविले नाही. माध्यमिक अथवा उच्च शिक्षणात मराठी माध्यम करावयाचे म्हटले की शास्त्रीय परिभाषेच्या प्रश्नावर अजूनही वादंग माजतात. शास्त्रीय विषय सुलभतेने समजावून देण्याचे काम इंग्रजीइतक्या प्रभावीपणे आणि समर्थपणे मराठी करू शकत नाही अशी कुरकुर विद्वान प्राध्यापकांच्याही तोंडून बऱ्याच वेळा ऐकू येते. पुस्तके नाहीत म्हणून परिभाषा नाही; परिभाषा बनलेली नाही, म्हणून पुस्तके लिहिता येत नाहीत; आणि हे दोन्हीही नसल्यामुळे मराठी माध्यमातून शास्त्रीय विषय समजावून देता किंवा घेता येत नाही असे एक दुष्ट विचित्र चक्रच निर्माण होते.

## तीन वैशिष्टये

'आईन्स्टाइनचे नवे विश्व' हे श्री. वा. ज. खेरांचे पुस्तक हे या सर्व विचित्र परिस्थितीला जणू उत्तर म्हणून उभे ठाकले आहे. किंबहुना या सर्व पार्श्वभूमीवर ते जास्तच उठावदार वाटते. पदार्थविज्ञानावर (Physics) लिहिलेले हे पहिलेच मराठी पुस्तक नाही. महाविद्यालयीन अभ्यासक्रमानुसार लिहिलेल्या विज्ञानशास्त्राच्या इंग्रजी पुस्तकांचे मराठी अनुवाद झालेले आहेत. परंतु त्या सर्वांपेक्षा प्रस्तुत पुस्तक वेगळे आहे. त्याची नसच वेगळी आहे. हा कशाचाही 'अनुवाद' नाही. भाषांतर नाही. चालू शतकाच्या प्रारंभी विज्ञानाच्या क्षेत्रात क्रांती घडवून आणणाऱ्या आईन्स्टाइनच्या अजब संशोधनाचे हे मराठीतून विवेचन आहे. मराठीतच विचार करून तो मराठीतच स्पष्ट केला आहे, हे या पुस्तकाचे पहिले वैशिष्टय. दुसरे महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे ज्ञान आणि मनोरंजन या दोन्ही पातळ्या प्रथमपासून अखेरपर्यंत अगदी समांतर ठेवण्यात लेखकाला कमालीचे यश मिळालेले आहे. अवघ्या विज्ञानात एका नव्या युगाचा प्रारंभ करणारे हे महत्त्वपूर्ण संशोधन पण त्याचे विवरण करताना कुठेही बोजडपणाचा, क्लिष्टतेचा आव आणलेला नाही. जेथे क्लिष्टता अपरिहार्य आहे तेथे तिची धार शक्य तितकी बोथट केली आहे. न जाणवण्याची काळजी घेतली आहे. आणि सर्वांत महत्त्वाचे तिसरे वैशिष्टय म्हणजे स्वतः ग्रंथकर्त्याला विषयाचे पुरेपूर, सुस्पष्ट व अचूक ज्ञान आहे. त्यांच्या

विचारांत कोठेही संदिग्धता नाही, अस्पष्टपणा नाही, स्वतःला न समजलेला भाग दडपून टाकण्याची वृत्ती तर मुळीच नाही.

सापेक्षतावाद हा नव्या युगाचा प्रारंभ आहे. एका नव्या शास्त्रीय सत्याची ही जाणीव आहे. द्रष्ट्याचा ज्यात संबंध येतो असे सर्व ज्ञान सापेक्ष असते. पदार्थाची गती आणि स्थिती या दोन्ही सापेक्ष आहेत. न्यूटनने गतिविषयक नियम मांडून दाखविले, पण शुद्ध किंवा खरी गती काय ते सांगता येणे शक्य नाही. पोकळीमध्ये स्थान ' (Place, Position) या शब्दाला काही अर्थ नाही. सामान्य व्यवहारापुरती पृथ्वी स्थिर आहे. पण खरोखर ती स्वतःभोवती आणि सूर्याभोवती फिरते; इतकेच नव्हे, तर सूर्यमालाही कोठेतरी चालली आहे याला आधार सापडले आहेत. आपणाला फक्त सापेक्ष गती कळते. परंतु पदार्थाची स्थितीही सापेक्ष आहे. फार काय, पदार्थाचे वस्तुमान अथवा मह (mass) आणि काल (time) याही ज्या दोन गोष्टी आजवर मूलभूत मानल्या गेल्या आहेत त्याही सापेक्ष आहेत. पदार्थ जितक्या वेगात असेल तितके त्याचे वस्तुमान कमी कमी होत जाईल. एखादा पदार्थ प्रकाशाच्या गतीने प्रवास करू लागला (अर्थात हे प्रत्यक्षात अशक्य आहे) तर तो पदार्थ अदृश्य होईल !

आईन्स्टाइनच्या सापेक्षतावादाने वास्तव शास्त्रांच्या मूलभूत सिद्धांतांची आणि प्रमेयांची फेररचना करण्याची आवश्यकता निर्माण झाली. या नव्या सिद्धांतांचे मर्म नीट समजून घेण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व पायऱ्या श्री. खेरांनी अगदी व्यवस्थित विशद केल्या आहेत. त्यासाठी मूळ विषयाच्या ओघातून किंचित विषयांतर करून बैजिक भूमिती (Co-ordinate Geometry) सारख्या गोष्टीही त्यांनी मुळापासून स्पष्ट केल्या आहेत. शास्त्राचा हा विभागच असा आहे की येथे गणित आणि विज्ञान यांचे परस्परसंकरण होते. त्यासाठी आवश्यक ते सर्व गणिती खुलासे श्री. खेरांनी मुळापासून दिले आहेत.

त्यामुळे उच्च अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना मातृभाषेतील विवेचनामुळे विषयाचे सुस्पष्ट आकलन होण्यास हा ग्रंथ साहाय्यभूत होईलच. परंतु ज्यांचे शिक्षण तेवढे झालेले नाही, पण समजावून घण्याची तीव्र इच्छा मात्र आहे, अशांनाही या ग्रंथामुळे ज्ञानसाधनेचे फळ मिळेल.

## चटकदार शैली

शास्त्रीय पुस्तकामध्ये भाषाशैलीचा विचार अप्रस्तुतच. जितकी काटेकोर, अचूक आणि संक्षेपित भाषा असेल तितकी शास्त्राला योग्य. पण खेरांच्या भाषेचे वैशिष्ट्य असे की, गणिती विश्लेषण आणि तात्त्विक सिद्धांत प्रतिपादन करताना काटेकोर, अचूक आणि संक्षेपित अशीच असणारी त्यांची भाषा उदाहरणांचे आणि स्पष्टीकरणाचे भांडार उघडू लागली की तिची कळी खुलते. ती दिलखुलासपणे हसू

लागते. वाचकांशी घरगुती सलोख्याने गप्पा मारीत, थट्टामस्करी करीत, नर्म विनोद करीत एकएक कोडे त्याला उलगडून दाखवू लागते. आणि मग पाहता पाहता एखादा सिद्धांत अशा खुबीने मांडते की त्याविषयी काही शंका राहूच नये. कितीतरी गंमतीदार उदाहरणांचे नमुने येथे दिसतील. सापेक्षतेचे महत्त्व वर्णिताना मजनूच्या दृष्टीने लैलाचे सौंदर्य उदाहरणादाखल येते. एका वरदायिनी देवीच्या कृपेने पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणक्षेत्रातून अलगद पडणाऱ्या प्रचंड खोलीत प्रभाकरपंत बसतात आणि हवेत तरंगणाऱ्या शिशाच्या गोळ्या एकमेकींवर आपटताना पाहतात. त्यातून आईन्स्टाइनच्या ' स्थलाच्या वक्रते 'ला प्रारंभ होतो. एका लक्षाधीशाने मृत्युपत्रात लिहिलेल्या विचित्र अटी पूर्ण करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाचे निरीक्षक न्यायालयात दावा नेतात आणि तो पूर्ण करण्यासाठी न्यायाधीश, वकील वगैरे मंडळींना आईन्स्टाइनच्या सापेक्षतावादाचा अभ्यास करणे भाग पडते.

या असल्या उदाहरणांमुळे शास्त्राच्या क्लिष्टतेविषयी अकारण भीती कमी होते आणि विवेचनाला नकळतच सुलभता प्राप्त होते. " सूर्य कितीही बुद्धिमान असला तरी त्याला रात्र या शब्दाचा अर्थ कळणार नाही, " " सृष्टी म्हणजे ' भ्रमिष्ट ' कणांचे तांडव म्हणता येईल. " " आपण पोटासाठी कचेरीत जातो, पण या विश्वात आपण कुठे, कसे, का चाललो आहोत ते कळत नाही. " यांसारखी वाक्ये त्यांतील चटकदारपणामुळे जितकी आवडतात, तितकीच ती अर्थपूर्ण असल्याने विषयाच्या अगदी अंतरंगाकडे नेण्यास वाटाडे होतात.

पुस्तकात भरपूर आणि सुबक आकृती व चित्रे असल्याने सौकर्य आणि सौंदर्य या दोन्हींतही वाढ झाली आहे.

विज्ञानाविषयी आवड आणि उत्सुकता असणाऱ्या प्रत्येकाने हे पुस्तक अगदी अवश्य वाचावे. ' लक्षपूर्वक वाचावे ' असे लिहिण्याची जरूरी नाही; कारण चटकदार भाषा, गंमतीदार उदाहरणे आणि सुस्पष्ट विवेचन यांमुळे ' लक्ष्यभेद ' होईपर्यंत वाचकाचे लक्ष अन्यत्र जाणे शक्यच नाही. थोडा विचार करण्याची, बुद्धीला थोडा ताण देण्याची तयारी आणि सवय मात्र हवी.

**[ ' आईन्स्टाइनचे नवे विश्व ' – वा. ज. खेर : समाज प्रबोधन संस्था : पृष्ठे ४४३ : किमत रु. ८-०० ]**

**– निशिकांत मिरजकर**

● ● ●

## जॉर्जसाब

[ पान ९ वरून पुढे चालू ]

घेऊन आलेली मुलं काही काम न मिळाल्याने हॉटेलमध्ये लागत. विफल होत आणि वाईट मार्गाला लागत. एकेका हॉटेलमध्ये या कामगारांची गाऱ्हाणी सोडविण्यासाठी अनेक प्रयत्न झाले. पण जोवर या साऱ्याच कामगारांमध्ये एकी नव्हती तोवर हे शक्य नव्हते. श्री. फर्नांडीस यांनी रात्रंदिवस या कामगारांच्या गाठीभेटी घेऊन त्यांची अभेद्य संघटना स्थापन केली आणि या केवळ एका दिवसाच्या संपाने त्यांना मासिक किमान ७५ रु. मिळवून देण्याची व्यवस्था केली. हॉटेल व्यवसाय हा तेव्हापासूनच कारखानदारीत समाविष्ट होऊ लागला.

**नायर हॉस्पिटलमध्ये**

कामगारांची संघटना करण्यासाठी फर्नांडीस यांच्याजवळचं भांडवल म्हणजे कामगारांशी वैयक्तिक संबंध, कामगारांविषयीचा अपार जिव्हाळा, कामगारांच्या प्रश्नासाठी वाटेल ते भांडण ओढवून घेण्याची तयारी आणि कामगार नेत्यांच्या ठायी आवश्यक असणारा भांडखोरपणा. साऱ्या कामगारांना फर्नांडीस यांच्या कामगारनिष्ठेविषयी खात्री आहे. म्हणूनच 'जॉर्जसाब'चं नाव घेतल्याबरोबर ते गहिवरतात.

केंप कॉर्नरवरच्या एका इमारतीत दोन खोल्यांमध्ये ते राहतात. बेस्ट कामगार युनियन, बॉबे लेबर युनियन आणि म्युनिसिपल कामगार युनियन या तीन संघटनांनी मिळून युनियनच्या कामासाठी एक साडेसात हजार रुपयांची सेकंड हँड गाडी घेतलेली आहे. ती ते वापरतात.

'माणूस'च्या कामासाठी मी त्यांना प्रथम भेटलो ते नायर हॉस्पिटलमध्ये पोटाच्या उपचारासाठी दाखल झाले होते. हॉस्पिटलच्या एका साध्या वॉर्डच्या बाहेरच्या व्हरांड्यात ते पडले होते. एका बाजूला रिकाम्या डब्यांची चळत होती, दुसऱ्या बाजूला रोग्यांच्या गाद्यांचा गठ्ठा. त्यांच्या पलंगावर वर्तमानपत्रांचा ढीग होता आणि ते वाचत पडले होते.

श्री. फर्नांडीस वाचतात खूप. त्यांनी वाचून वाचूनच स्वतःचे शिक्षण करवून घेतले. रोजची सर्व वर्तमानपत्रे अतिशय चिकित्सकपणे आणि काळजीपूर्वक वाचतात. त्यांच्या ऑफिसमध्ये मी गेलो तेव्हा ते कुणाला तरी फोन करीत होते—"हे, लुक लक्ष्मण हॅज कम आउट विथ ए ब्रिलीयंट कार्टून विस मॉर्निंग." 'टाईम्स ऑफ इंडिया'त आलेल्या "पिपल आर बिहाइंड अस" या सुप्रसिद्ध कार्टुनबद्दल ते बोलत होते.

मी त्यांना विचारले, "तुम्ही संप वगैरे आजपर्यंत बरेच केलेत. पण त्यातल्या

त्यात एखाद्या संपात खूप मार खाल्ला असा संप आठवतो का ?"

श्री. फर्नांडीस म्हणाले, "तसा मार बऱ्याच संपांत खाल्ला आहे. पण कामगार चळवळीत कधीच 'मार' बसत नाही अशी माझी श्रद्धा आहे. कुठलाही संप वगैरे अयशस्वी झाला तरी त्यातून कामगार चळवळ ही पुढेच जात असते. उदाहरणेच द्यायची तर किती तरी देता येतील. आम्ही एका हॉटेलसमोर कामगारांच्या पगारवाढीसाठी अकरा महिने पिकेटिंग केलं काही परिणाम झाला नाही. सरळ आपटी खाल्ली. पण त्यातूनच पुढे हॉटेल कामगारांची चळवळ फोफावली. म्युनिसिपल कामगारांचा संप फसला तेव्हा ४०० कामगारांना काढले आणि कित्येक हजार कामगारांवर अन्याय झाले. पण त्याचा परिणाम असा झाला की केवळ मुंबईतच नव्हे तर सगळ्या हिंदुस्थानात राहणीमान निर्देशांक लावायला सुरुवात झाली. संपात वगैरे मार बसला की कामगार चळवळीला वरवर धक्का बसल्यासारखा वाटतो. पण ती जर संस्थात्मक संघटनेची चळवळ असली तर ती पुढेच जाते. पुढाऱ्याच्या पिशवीतली ती जर चळवळ असली तर मात्र खरोखरच मार बसतो, म्हणून मला वाटते, कामगारांची चळवळ ही सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अशी शिस्तबद्ध चळवळ असली पाहिजे. तरच पुढे जाते."

### देशाची फिकीर कोणाला ?

श्री. फर्नांडीस यांनी ट्रेड युनियनिझमचा सखोल आभ्यास केला आहे. कामगार चळवळ केवळ व्यावहारिक फायद्यासाठी किंवा केवळ राजकीय फायद्यासाठी चालविणारावर त्यांचा आक्षेप आहे. ते म्हणतात, "कामगार चळवळ ही समाजकारणापासून अलग राहूच शकत नाही. अशी स्वतंत्र चळवळ टिकूच शकत आही. चळवळीपुढे समाजहिताची मोठी दृष्टी पाहिजे तरच तीतून काही कायम स्वरूपाचे निष्पन्न होते. म्हणूनच कामगार चळवळ आणि समाजवादी चळवळ या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे वाटते."

संपामुळे राष्ट्रीय संपत्तीचं नुकसान होतं, उत्पादनात खीळ पडते, हा विषय मी काढला मात्र, फर्नांडीस एकदम चवताळून तळमळीने बोलू लागले, "मालकांना काय वाटते कामगारांना उत्पादनाची काहीच फिकीर नाही ? मालकांचा जेव्हा नफा कमी पडू लागतो तेव्हा त्यांना उत्पादनाची फिकीर वाटते काय ? कामगार स्वतः उत्पादन करतात. खरा उत्पादक कामगार आहे. उत्पादन-व्यवस्थेत मालकांचे स्थान काहीच नाही. या उत्पादक कामगारांना तुम्ही हलाखीच्या स्थितीत ठेवून राष्ट्रीय उत्पादक शक्ती खच्ची करता त्याचं तुम्हांला काहीच वाटत नाही काय ? आजच्या अर्थव्यवस्थेमुळे, मालकशाहीमुळे, नोकरशाहीमुळे देशाचे रोज कोटचवधी रुपयांचे नुकसान होते. पण जेव्हा उत्पादक कामगार आपल्या न्याय्य हक्कासाठी लढा देतात तेव्हा तुम्हांला नुकसानी जाणवते काय ?"

जरा दम घेऊन श्री. फर्नांडीस पुढे बोलू लागले, "आणि आजपर्यंत लढ्याशिवाय

'मालकांनी आम्हांला काय दिलं ? हॉटेल कामगारांच्या बाबतीत घ्या, म्युनिसिपल कामगारांच्या बाबतीत घ्या, लढा दिल्याशिवाय मालकांनी म्हणा, सरकारने म्हणा आमच्याकडे ढुंकूनही पाहिलं नाही. कुणी आम्हांला सांगायला आला नाही की तुमचं चुकतं आहे. तुम्ही या मार्गांनी गेलात की तुमच्या न्याय्य मागण्या पूर्ण होतील असं कुणी सांगितलं नाही. लोक म्हणतात, तारापूर संपात आम्ही देशाचं नुकसान केलं. मी म्हणतो ज्यांनी उघडउघड अन्याय करून आमच्यावर संपाची पाळी आणली त्यांच्यावर या नुकसानीची जबाबदारी येते. त्यांना जर देशाची फिकीर असली तर त्यांनी ही पाळी आणलीच नसती.

"आणि देशातल्या मालकांना सत्ताधाऱ्यांना देशाची फारशी फिकीर आहे असं मला वाटत नाही. चिनी आक्रमणाच्या वेळी कामगारांचे संप निदर्शने टाळण्याविषयीची एक योजना मी स्वत: आपणहून तयार करून सरकारकडे आणि कारखानदारांकडे पाठवली होती. एकट्या नवल टाटांनी त्या योजनेविषयी थोडीशी उत्सुकता दाखवली. त्या वेळी महाराष्ट्राच्या मंत्र्यांनी तर त्या योजनेला चक्क केराची टोपली दाखवली. त्यांना कुठे हवी आहे औद्योगिक शांतता ! केवळ किरकोळ राजकारणात ते सुख मानतात. मोठी दृष्टीच नाही."

"मालक म्हणतात, कामगार चळवळ म्हणजे शुद्ध गुंडगिरी आहे. तुम्ही काय म्हणता ?" मी विचारलं.

"मी म्हणतो, त्या मालकांचं 'शिक्षण' पूर्ण झालं नाही. ज्यांचं खरं 'शिक्षण' पूर्ण झालं नाही, तेच अशी भूमिका घेऊ शकतात."

## रेल्वेची चाके

अवघ्या छत्तीस वर्षांचा हा ब्रह्मचारी लढाऊ कामगार नेता बोलण्यात तिखट, हजरजबाबी आणि मनमिळाऊ वाटतो. मराठी, हिंदी, उर्दू, कोकणी, कानडी आणि इंग्रजी या भाषा त्यांना अस्खलीतपणे बोलता येतात. बाणा स्वतंत्र आहे. कामगार चळवळीचा अभ्यास करण्यासाठी ते रशियात जाऊन आले आहेत. पण कम्युनिस्टांच्या आहारी आपल्या संघटना त्यांनी कधीच जाऊ दिल्या नाहीत.

मी त्यांना विचारलं, "लोक विचारतात मुंबईतील सगळ्या महत्त्वाच्या कामगारांना तुम्ही संघटित केलं. पण मुंबईच्या लोकलच्या मोटरमेनना केव्हा संघटित करणार बोला."

त्यावर चुटकी वाजवून ते म्हणाले, "दोन वर्ष. तुम्ही मला फक्त दोनच वर्ष द्या. नुसते मुंबईतलेच नव्हेतर साऱ्या हिंदुस्थानातले रेल्वेकामगार संघटित करायचे आहेत. रेल्वेचं चाक बंद पाडण्याची ताकद जोवर आमच्यात येऊ शकत नाही तोवर कामगार चळवळीला तीव्रता येऊ शकत नाही हे आम्ही जाणून आहोत. काम फार प्रचंड आहे. पण आमची तयारी चालू आहे."

● ● ●

# भिंतीच्या तुकड्या

सुधाकर राजे

## ☐ फॅशनेबल निरक्षरता

फार प्राचीन काळी—म्हणजे अस्मादिक बिगारीत असताना—अशी वेडगळ समजूत होती की मुळाक्षरे गिरवली की माणूस साक्षर होतो. शिक्षणाला शाळा, पाटीदप्तर, पुस्तकं अन् मास्तर एवढा सगळा सरंजाम आवश्यक आहे, असे त्या काळी मानीत. मला वाटते असल्या वेडपट समजुतींनी पछाडलेले शिक्षण घेतल्यामुळेच-मी निरक्षर राहिलो व पत्रकार झालो. – कारण पत्रकार हा निरक्षर लोकांचा व्यवसाय आहे, असे बर्नार्ड शॉने सांगून ठेवले आहे. तेच आताच्या फॅशनेबल निरक्षरतेची गोष्ट घ्या. परवा आपल्या सुविद्य प्रधान मंत्राणींनी एका परिषदेत भाषण करताना म्हटले, निरक्षरता हा जगड्व्याळ प्रश्न असल्याने तो सोडविण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याची जरुरी आहे; म्हणून १९६१ साली युनेस्कोच्या परिषदेत भारतीय प्रतिनिधि-मंडळाने फ्रेंच प्रतिनिधि-मंडळाच्या एका सूचनेला खास पाठिंबा दिला होता. ती सूचना कोणती ? – मागासलेल्या देशांत साक्षरताप्रसार करण्यासाठी "कम्युनिकेशन सॅटेलाइटस्" तयार करावेत. आता बोला ! हिंदुस्थानातल्या दरिद्री खेड्यांतून लक्षावधी उघड्या—नागड्या अन् शेंबड्या—लेंबड्या निरक्षर पोरांना साक्षर करण्यासाठी गावोगावी शाळा काढण्याचा अव्यापारेषु व्यापार हवा कशाला ? प्रत्येक खेड्यात दोन-चार लाख रुपयांचे सॅटेलाइट रिसीव्हिंग स्टेशन उभारले की प्रश्न मिटला. दोनशे वर्षांपूर्वी फ्रान्सच्या कामगार जनतेत "रोटी, रोटी ! " असा हाहाःकार उडाला तेव्हा राणी मेरी अँन्टॉयनेटला नवल वाटले अन् तिने विचारले, या लोकांना रोटी मिळत नाही तर ते केक का खात नाहीत?" इतकी पुरोगामी विचारसरणी दोनशे वर्षांनंतर का होईना, पण हिंदुस्थानात आली म्हणायची.

तसा विचार केला तर इतरही बरेच जुने प्रश्न अशा नवीन पद्धतीने सोडविता येतील. उदाहरणार्थ, अधिक धान्य पिकविण्यासाठी नांगराला बैल जोडणाऱ्या शेतकऱ्यांना सांगता येईल, बाबांनो, संगीताने धान्य पिकते असा शोध लागला

असताना आता नांगर कसले फिरवीत बसलात ? आता शेता-शेतांतून " आओ, ट्विस्ट करे " च्या रेकॉर्ड लावा. लज्जा-रक्षणासाठी बोटभर सुती लंगोटीवर समाधान मानणाऱ्या मावळ्याला सांगावे, आता कागदापासून कपडे तयार करता येतात, तेव्हा 'माणूस 'सकट दीडशे दिवाळी-अंकांपैकी कुठलाही एक गलेलठ्ठ अंक घेतलास तर तुला अगदी सुटात मिरवता येईल. शेणामातीच्या झोपड्या बांधून राहणाऱ्या भिकाऱ्यांनाही प्लास्टिकची घरे बांधण्याचा शोध लागला आहे हे कळवावे आणि सुबक घर कसे असावे याची कल्पना येण्यासाठी नव्या दिल्लीतली अमेरिकन एम्बॅसी दाखवावी – खरे म्हणजे कॉबनिए चंदीगड बांधायला आला तेव्हाच त्याच्याकडून आधुनिक स्लमला शोभेल अशा झोपडीचे डिझाइन करून घ्यायला हवे होते……

## □ मुंबईचे बारसे

तुम्ही कधी " आपण साम्राज्यवादाला घालवून देऊ " या गेला आहात काय? असे गोंधळून जाऊ नका. हे एका शहराचे नाव आहे. लहानपणी गावांच्या नावांच्या भेंड्या लावताना आपण सगळेच चोरून ॲटलास पाहत असू. पण त्या वेळी हे गाव होते तरी हे नाव नव्हते. त्या वेळी नाव साधेसुधे हाँगकाँग असे होते. पण आता लालचीनच्या लाल रक्षकांनी हाँगकाँगचे नव्याने बारसे करून हे नाव ठेवले आहे. हे लाल रक्षक तेरा ते अठरा वर्षे वयाचे आहेत म्हणतात, तेव्हा हा एक पोरकट-पणाचा प्रकार आहे असे एरवी म्हटले असते. पण सत्तरी उलटलेला माओच लाल रक्षक संघटनेचा सदस्य झाला आहे, तेव्हा तसे म्हणायची सोय उरली नाही.

उलट माझ्या मते गावांची अशी अन्वर्थक नावे ठेवायची प्रथा " इंडिया दॅट इज भारत " असे ऐसपैस नाव असलेल्या आपल्या देशातदेखील यायला हवी. दिल्लीचेच नाव घ्या. " एकमेका साहाय्य करू, अवघे धरू इलेक्शन-पंथ ! " हे नाव दिल्लीला अधिक शोभते की नाही ? आणखी अशीच उदाहरणे देता येतील – मुंबई : " चौपाटीच्या भेळपुरीसकट कोना कॉफीचा प्रोग्राम झालाच पाहिजे ! " कलकत्ता : " भद्र लोकहो चला, दोन-चार ट्रामगाड्या जाळून 'बंद' साजरा करू या. " मद्रास : " डाउन्न विथ् हिंदी, अप्प विथ् स्टेनोग्राफी. " नाशिक, बनारस किंवा हिंदूंचे कुठलेही तीर्थस्थान : " डर्टीनेस इज नेक्स्ट टु गॉडलीनेस." – आणि " मी धोतरावर हॅट का घालतो ? हा तत्त्वाचा प्रश्न आहे. " हे कुठल्या शहराचे नाव असू शकेल ? फक्त एकाच – पुणे !

• • •

## जर्मनीच्या प्रचारतंत्राचा कणा

# नाझी प्रचारपट

रमेश के. सहस्रबुद्धे

प्रचाराच्या अत्यंत प्रभावी पद्धती आज उपलब्ध आहेत. पण या सर्वांचा शिरोमणी जर कोण असेल तर ते म्हणजे चित्रपट. चित्रपट हे माध्यमच असे आहे की, माणसाला ते सर्व दृष्टीने जवळचे वाटते. चित्रपट तंत्र, पद्धती आणि माणसाची विचारपद्धती ही एकमेकांशी जुळणारी असते. त्यामुळे चित्रपटाद्वारे केलेला प्रचार हा माणसांच्या रक्तात भिनविता येतो. चित्रपट पाहताना मनुष्य प्रत्यक्षात एकाजागी बसलेला असला तरी त्याचे मन मात्र समोरच्या पडद्यावर दिसणाऱ्या दृश्यात गटांगळ्या खाऊ लागलेले असते. त्या दृश्याशी आपला प्रत्यक्ष संबंध असल्यासारखे त्याला वाटू लागते व एखाद्या मोहिनी घातलेल्या माणसाप्रमाणे निदान सिनेमा पाहताना तरी समोरच्या दृश्यांचा त्याच्या मनावर एकप्रकारे पगडा बसू लागतो.

सिनेमा माणसावर एकप्रकारची मोहिनी घालून त्याला पडद्यावर दिसणाऱ्या दृश्याशी एकरूप; एकचित्ती व्हावयास लावतो, आणि अशा या मोहिनी घातलेल्या अवस्थेत जर प्रचाराचे पिल्लू सोडले तर त्याचा माणसाच्या मनात सहज प्रवेश होतो. म्हणूनच मग मुद्दाम केलेला प्रचार हा प्रचार नसून ती सत्य घटनाच आहे असे त्याला वाटू लागते. सिनेमा आणि माणसाचे मन यांचा हा अत्यंत जवळचा नाजूक संबंध हेरून त्याचा प्रचारासाठी उपयोग करणारा डोकेबाज माणूस हिटलरच्या काळात उदयास आला. त्याचे नाव गोबेल्स. हिटलरचा हा प्रचारमंत्री होता आणि हिटलर आपल्या कारकीर्दीत ज्या अशक्य वाटणाऱ्या असंख्य गोष्टी शक्य करू शकला त्या केवळ त्याच्याजवळ गोबेल्ससारखा कुशल व पद्धतशीर प्रचारमंत्री होता म्हणूनच !

प्रचारासाठी सर्वांत उत्तम साधन म्हणजे सिनेमा हे त्याने अगदी अचूक हेरले. आणि युद्धकाळात त्याचा त्याने महान अस्त्र म्हणून उपयोग केला. आधुनिक युद्धतंत्राची नाडी म्हणजे प्रचार, हे समीकरण हिटलरच्या मनात ठाम होते. आणि म्हणूनच जर्मन प्रचारतंत्र प्रभावी करण्यासाठी एक वेगळेच खाते निर्माण करण्यात आले होते या खात्यापुढे प्रचार चित्रपट (Propaganda Films) काढण्याचे काम अत्यंत योजनापूर्वक सुपूर्त करण्यात आले होते.

## युद्धप्रवृत्तीचे बाळकडू

जर्मनीने हे प्रचारपट दोन प्रमुख कारणांसाठी वापरले. ही दोन्ही कारणे अगदी अघटित वाटली तरी त्या काळच्या जर्मनीला ती अत्यंत आवश्यक होती. पहिले म्हणजे जर्मनांना युद्धप्रवृत्ती रक्तात भिनलेली अशी नवी पिढी निर्माण करावयाची होती. त्या दृष्टीने प्रत्येक जर्मन मुलाच्या मनात युद्ध ही आवश्यक बाब आहे, आणि त्यचा अवलंब केल्याशिवाय गत्यंतर नाही, हे जर्मन राज्यकर्त्यांना ठसवावयाचे होते – त्यांना युद्धपिपासू बनवावयाचे होते. त्यांच्यांत क्रूरता (Cruelty) निर्माण करावयाची होती. हे ध्येय डोळयांसमोर ठेवून जर्मनांनी क्रूरतेने पुरेपूर भरलेले असंख्य लघुपट निर्माण केले. हे लघुपट जर्मनीतील ९ ते १५ वर्षे वयाच्या मुलांना नियमितपणे दाखविले जात. आणि त्यांची मने या क्रूरतेच्या साच्यात ओतली जात. हे चित्रपट एवढे भयंकर असत की, भारतात वय वर्षे २५ ते ४० च्या दरम्यानची माणसे फार काळ हे लघुपट पाहू शकत नाहीत. त्यातील बरेच एकतर बेशुद्ध तरी पडतील अथवा पळ तरी काढतील असे म्हणतात.

माणसाला क्रूरता म्हणजे काय हे बालपणापासूनच कळले नाही तर ज्या गोष्टी क्रूर म्हणून सारे जग म्हणते, त्या त्याला क्रूर वाटणार तरी कशा ? क्रूरता ही क्रूरता नाहीच, तर ते एक भूषण आहे व तसे करणे हे प्रत्येकाचे आद्य कर्तव्य आहे, असेच मुळी त्यांच्या मनावर लहानपणापासून बिंबविण्यात आलेले. मग कसलीही धाडसी व क्रूर कृत्ये युद्धात करण्यास ते कचरतील तरी कशाला ?

याखेरीज आणखी वेगळ्या प्रकारचे चित्रपट नाझींनी प्रचारपट नावाखाली काढले होते. प्रत्येक सैनिकास युद्धावर जाण्यापूर्वी हे युद्धपट दाखविण्यात येत आणि एकप्रकारचे नैतिक व मानसिक धैर्य या द्वारे त्यांच्यांत निर्माण केले जाई. सैनिकांचे नीतिधैर्य (Moral) उच्च राखणे हा पण त्याचा उद्देश होता. यासाठी प्रत्यक्ष युद्धाच्या खाईत घेतलेल्या फिल्मची व्यवस्थित संकलित केलेली आवृत्ती उपयोगात आणली जाई. सोबत जर्मनीबाबतची फुशारकी आणि इतरांची चेष्टा आदी तऱ्हेचा प्रचार हा असावयाचाच !

परंतु या दोन्ही प्रकारांतून ज्या प्रमुख कारणांसाठी जर्मनांनी युद्धपट काढले ते म्हणजे जर्मनीस उपयुक्त व इतरांना खाली पाहावयास लावणारा प्रखर प्रचार. इतर राष्ट्रांच्या युद्धकैद्यांकडून मिळविलेली फिल्म व स्वतःच्या स्टॉकमध्ये असलेली फिल्म या सर्वांची अशा काही तऱ्हेने व्यवस्थित मांडणी केली जाई की, त्यातून पाहणाऱ्यावर असा परिणाम व्हावा की, त्याला वाटावे जर्मनी हे अगदी सोज्वळ राष्ट्र असून इतरच राष्ट्रे युद्धात अत्याचार करीत आहेत.

नाझी राज्यकर्त्यांनी प्रचाराला अग्रस्थान दिले होते. राजकीय दृष्टचा प्रचार म्हणजे जर्मनीचा आत्मा होता. आणि म्हणून जेव्हा युद्ध पेटले तेव्हा जर्मनीच्या प्रचारखात्याने (Propaganda Ministry) लहानशा युद्धपटांचा, युद्धप्रचाराचे

आवश्यक साधन म्हणून अगदी बेमालूमपणे उपयोग करून घेतला. जर्मनीचा प्रचारप्रमुख गोबेल्स याने तर सर्व तऱ्हेच्या व सर्व थरांतील लोकांपर्यंत युद्धवार्तापट (News Reels on War) पोहोचतील, अशी व्यवस्था केली होती. गोबेल्सच्या या प्रचारपटांना परदेशातही दाखविता येईल, अशी जबर यंत्रणा जर्मनीने निर्माण केली होती. 'Our war shorts must address people of all strata' असा गोबेल्सचा आग्रह असल्याने, हा दृष्टिकोन सदैव डोळ्यांसमोर ठेवून सदर युद्ध-प्रचारपट तयार केले जात. तसेच ते जर्मन नागरिकांना नियमितपणे दाखविण्याची व्यवस्था पण करण्यात आलेली होती.

## लोकशाहीवर सूक्ष्म आघात

नाझी प्रचारपट उत्कृष्ट बनविण्यासाठी त्यांत नानाविध पद्धतींचा कौशल्याने उपयोग केलेला आढळतो. हा प्रचार चित्रपटद्वारे कौशल्याने दाखविण्याच्या अनेक नवीन पद्धती त्यांनी शोधून काढल्या, फोटोग्राफी, ध्वनी आणि संकलन या तीनही तंत्रांचा उत्कृष्ट संगम करून त्यातून आवश्यक अशी उत्कृष्ट प्रचारनिर्मिती कशी करावी, हे नाझींना चांगले साधले होते. हे प्रचारपट माणसाच्या मानसिक भूमिकेचा व मानसिक परिणामांचा अभ्यास करून बनविलेले होते.

युद्धाची तंत्रे बदलत चालली आहेत, हे हुशार हिटलरने त्वरित हेरले. शत्रूला गोंधळात पाडणे (Confusing) आणि त्यांच्यात गटनिर्मिती (Dividing) करणे या गोष्टी चालू युद्ध जिंकण्यासाठी अत्यंत आवश्यक आहेत, हे जाणून त्यासाठी हिटलरने मानसशास्त्रावर आधारित अशी प्रचारपद्धती बनविली. हिटलर म्हणतो, The place of artilary preparations and frontal attack by the infantry in trench warfare will in future be taken by propaganda, to break down the enemy psycologically before the armies begin to function at all ... mental confusion, contradiction of feeling, indecisiveness, panic, these are our weapons. When the enemy is demoralised from within, when he stands on the brink of revolution, when social unrest threatens, that is the right momement. A SINGLE BLOW WILL DESTROY HIM. "–आणि नाझी कारकीर्दीचा इतिहास पाहता या साऱ्या गोष्टी खरोखरीच जर्मन प्रचारपटांच्याद्वारे साध्य झाल्या होत्या, शक्य झाल्या होत्या, हे नाकारून चालणार नाही. आपल्या प्रचारपटांच्याद्वारे त्यांनी जणू लोकशाही मूल्यांवर आक्रमण केले. लोकशाही राष्ट्रांतील जनतेच्या मनातील दुबळी स्थाने शोधून, लोकशाहीच्या काही दुबळ्या तत्त्वांवर त्यांनी चांगलाच हल्ला केला. या प्रचारपटांच्याद्वारे अप्रत्यक्षरीत्या इतर देशांतील जनतेच्या मनात एक प्रकारचे राज्यकर्त्यांविरुद्धचे संशयी वातावरण पसरविण्यास त्यांनी सुरुवात केली. आणि अशा रीतीने नाझी प्रचारपटांनी शत्रूला आतून पोखरले.

प्रचारासाठी दोन प्रकारच्या फिल्म्स नाझी प्रसृत करीत. (१) आठवड्यातून निघणारे युद्ध वार्तापट (News Reels), (२) प्रचार मालिकेतील युद्ध लघुपट '(Campaign Films)'.

**युद्धपटाचे तंत्र**

जर्मन युद्ध वार्तापट हे तीन तत्त्वांवर अधिष्ठित असे होते. पहिले तत्त्व म्हणजे या वार्तापटांसाठी वापरण्यात येणारे शॉट्स् हे प्रत्यक्ष युद्धाच्या ठिकाणी घेतलेले असावेत. प्रत्यक्ष रणांगणावर घुमश्चक्री चालू असताना विमानादी वाहनांत बसविलेल्या गुप्त कॅमेऱ्यांतून घेण्यात आलेल्या फिल्ममधूनच हे वार्तापट तयार करण्यात आले होते. प्रेक्षकाला आपण प्रत्यक्षात लढाई पाहत आहोत, असे वाटले पाहिजे म्हणून ही सारी घडपड होती. या कामासाठी त्यांनी नेमलेले कॅमेरामन हे प्रत्यक्ष आघाडीवर लढाई करणारे सैनिकच असत. 'Army cameramen are regular soldiers doing a soldier's full duty, always in the first lines. ...' त्याचप्रमाणे हे सैनिक पण प्रत्यक्षात रणांगणावर फिल्म घेत असत. या फिल्म्सच्या वास्तवतेची साक्ष म्हणून अशी फिल्म घेत असताना आघाडीवर मरण पावलेल्या कॅमेरामनची नामावली पण ते प्रसिद्ध करीत असत. त्यामुळे या फिल्म्सच्या खरेपणाबद्दल प्रेक्षकांची खात्री पटत असे. क्वचितप्रसंगी फिल्म घेताना आघाडीवर मृत्यू पावलेल्या कॅमेरामनच्या मृत्यूची पण फिल्म दाखविली जाई. 'Victory in the West' मध्ये वरील प्रकारचा थोड्या प्रमाणात अवलंब केल्याचे आढळते.

या वार्तापटांतील दुसरी प्रमुख गोष्ट म्हणजे लांबी. आपणांस पोषक अशा प्रचाराच्या गोष्टी प्रेक्षकांच्या मनावर नीट बिंबविण्यासाठी त्या वार्तापटांतून अनेकवेळा दाखविल्या गेल्या पाहिजेत. आणि म्हणूनच हे साध्य करण्यासाठी जर्मन वार्तापट मुद्दामच अधिक लांब ठेवण्यात येत. युद्ध वार्तापटांचे तिसरे वैशिष्टय म्हणजे 'गतिमानता (Speed).' संकलनाच्या द्वारे या वार्तापटांतील प्रसंग अशा गतीने दाखविले जात की, प्रत्यक्षात आपण युद्ध आघाडीवरच आहोत, असा भास व्हावा.

प्रचारासाठी नाझींनी फिल्ममध्ये अनेक निरनिराळी तंत्रे वापरली. अप्रत्यक्ष प्रचारतंत्र हे त्याचा प्रमुख आधार होते. नाझींच्या या तंत्राबाबत लिहिताना सिनेतज्ज्ञ सिगफ्रिड क्रॉकॉअर म्हणतो, 'Rather than suggesting through information, Nazi propaganda withheld information or degraded it to a further means of propagandistic suggestion. This propaganda aimed at psycological retrogression to manupulate people at will' हरतऱ्हेच्या तांत्रिक युक्त्या व त्यांद्वारे घडवून आणले जाणारे दूरवरचे परिणाम ह्यांवर नाझी प्रचाराचे बरेच यश अवलंबून होते.

संकलन या तंत्राचा अभ्यास नाझी प्रचारपट निर्मितीप्रमुखांनी विशेषेकरून



शत्रूला
खरण्याचे
हुकूमशाही
तंत्र

-डॉ. गोबेल्स

केला होता. या तंत्राच्या साहाय्याने असंख्य प्रकारच्या युक्त्यांच्या शिताफीने अवलंब करिता येतो, हे त्यांना चांगले ज्ञात होते. लेनी रेफेन्स्टालच्या 'Triumph of the Will' या प्रचारपटात बरेचसे यश हे निव्वळ संकलन तत्त्वावरच अवलंबिलेले होते. कॉमेन्ट्री, दृश्ये व संगीत या तिन्हींचा उत्कृष्ट संगम करून त्यांद्वारे प्रचाराचा डोस पाजणे हे त्यांच्या संकलन कौशल्यामुळेच त्यांना शक्य होते.

युद्धपटांची सुरुवात साधारणपणे कॉमेन्ट्रीद्वारे तपशील देण्यात व्हावयाची. जर्मन सैन्य कुठे लढत आहे, त्यांनी परराष्ट्रांची किती हानी केली आहे, वगैरे आकडेवारी सांगितली जाई. मात्र हे सारे बोलले जात असताना मधूनच प्रत्यक्षात दृश्यांच्या द्वारे

हे बोलणे मानवी मनावर नकळत बिंबविले जाई. प्रत्यक्ष युद्धाची दृश्ये पाहत असताना सोडलेल्या या माहितीचा मानसिकदृष्ट्या बराच परिणाम होत असे. त्यातच भर म्हणून जर्मनीच्या विजयाच्या दृश्यांबरोबरच वातावरणास पोषक असे संगीत चालू होई. 'Victory in the West' ह्या युद्धपटात वरील तंत्राचा कौशल्याने उपयोग केलेला आहे.

वेगवेगळ्या आघाड्यांवरील गोष्टी प्रत्यक्षात दाखविणे व मधूनच ह्या सर्व गोष्टी जणू आपण स्वतःच रणांगणावर आहोत अशा स्वरूपात पाहणाऱ्या प्रेक्षकांच्या कानांवर इतर देशांनी केलेल्या अत्याचारांसंबंधी व जर्मनीच्या गौरवासंबंधीची काही वाक्ये कॉमेन्ट्रीद्वारे सोडणे हे तंत्र त्यांना फारच जमले होते. त्याचा परिणामही नकळत पाहणारांच्या मनावर होत असे. प्रचारपटांत सर्वत्र दोस्त सैनिकांचा अत्याचार दाखविणे, त्याचा प्रेक्षकांच्या मनावर पगडा बसला रे बसला की, हळूच कॉमेन्ट्रीद्वारा असे शब्द बाहेर पडावयाचे– "आणि अशा या अत्याचारांच्या उच्चाटनासाठी जर्मनी लढत आहे", साहजिकपणेच पाहणाराच्या मनात जर्मनीबद्दल सहानुभूती व दोस्तांबद्दल द्वेष निर्माण झालाच म्हणून समजा.

## सैनिक आणि नागरिक

तसेच युद्धकाळात सैनिकांना खूष ठेवण्यासाठी, पक्ष हा फारसा महत्त्वाचा नसून सैनिक कसे अधिक महत्त्वाचे आहेत, हे हेतुपुरःस्सर दाखविले जाई. पक्षप्रमुख एखाद्या नवीन रिक्रूटाशी हस्तांदोलन करिताना आढळेल तर कधी त्याच्या पाठीवर प्रेमाने थाप मारून त्याला प्रोत्साहन देईल. ह्यामुळे सैनिकांना सदैव खुष ठेवता येई. वास्तविक प्रत्यक्षात मात्र पक्षप्रमुखाचीच–हिटलरचीच–सत्ता सर्वत्र चाले. मात्र हे करिताना सैन्य शेफारले जाणार नाही याचीपण काळजी घेतली जाई. या सर्व गर्दीत मधूनच हिटलर हा सर्वांवर सत्ता गाजवीत आहे असे दाखविणारी दृश्ये घुसडली जात. त्यांद्वारा हे सारे असले तरी हिटलर ही कोणी शक्तिमान व सूत्रधार असामी आहे व त्याच्याच तंत्राने चालण्यात भले आहे, असा प्रचार सैनिकांच्या मनात बिंबविण्याचे कामही मधूनच टाकलेली ही हिटलरची दृश्ये नक्कीच करीत असत.

या युद्धात दुसरी आघाडी जी नागरिक, त्यांना संपूर्णपणे वगळण्यात येई. सर्व जोर सैनिकांवर दाखविला जाई. सैनिकांचे कौतुक करणारे नागरिक क्वचितच दाखविले जात. आणि दाखविलेच तर तेसुद्धा कामगारच दाखवीत. 'Victory in the West' या प्रचारपटात सैनिकांचे स्वागत करणारे जे नागरिक दाखविले आहेत ते सारे दारूगोळा तयार करणाऱ्या कारखान्यांतील कामगार. याच वेळी पार्श्वभूमीवर कॉमेन्ट्री चालू असते ती अशी, 'The best comrade of the German soldier is the amunition worker'.

सैनिक हे प्रेक्षकांना जवळचे वाटावे म्हणून या प्रचारांत मधूनच आपल्या नित्याच्या परिचयाची नित्यकर्मे पण दाखविली जात. सैनिक हे लढत असले तरी ते

आपल्यासारखेच मानव आहेत, असे वाटून त्यांबाबत आत्मीयता निर्माण व्हावी हा यामागील प्रमुख उद्देश असे. युद्धभूमीवर रणगाडे, विमाने, तोफा, यांची धडाडधुम झाल्यावर लगेच कॅम्पवर फावल्या वेळात सैनिक नेहमीची कामे करिताना दाखविले जात. कोणी खात आहे, कोणी कपडे धूत आहेत, पत्रें लिहीत आहेत, वगैरे.

जर्मन सिनेमाबाबत तज्ज्ञ समजला जाणारा क्रॉकॉअर (Kracauer) याबाबत म्हणतो, " Nazi film propaganda thus emphasizes general human needs, for two reasons. First in doing so it utilizes the lesson that the gallery likes nothing more than the presentation of vulgar everyday procedures. Secondly, such scenes have the advantage of appealing specifically to insties common to all people. Like spear-heads, they drive wedges into the defense lines of the self and owing to the retrogesion they provoke, totalitarian propaganda conquers important unconscious positions. " या क्रॉकॉअरच्या म्हण-ण्यात खरोखरीच तथ्य आहे. तो म्हणतो, ' Victory in the West ' हा युद्धपट मी सहा वेळा पब्लिक थिएटरमध्ये पाहिला, त्यात एक प्रसंग असा आहे की, युद्धाच्या जोरदार धुमश्चक्रीनंतर कॅम्पवर विश्रांतीच्या काळात एक सैनिक आपल्या नागड्या दोस्ताच्या अंगावर थंडगार पाणी टाकून त्याची मजा करीत आहे. हा प्रसंग थिएटरमधील बहुसंख्य प्रेक्षकांना आवडला आहे.

आपल्या सैनिकांचे दोस्त सैनिकांपुढे श्रेष्ठत्व सिद्ध करणे हा जर्मन चित्रपट निर्मात्यांचा नेहमीचाच दृष्टिकोन असे. प्रचारपटातून हे फार उत्तम तऱ्हेने दाखविले जाई. निरनिराळ्या युद्ध कैद्यांचे कॅम्प्स दृश्यांत दाखविले जात. त्यांत जर्मन कैदी हे सदैव युद्धाची व देशाची काळजी करीत बसलेले दाखविण्यात येत. पण इतर फ्रेंच, अमेरिकन, ब्रिटिश युद्धकैदी मात्र देशाची फारशी फिकीर न करता या युद्धकैद्यांच्या कॅम्पमध्ये गाणे बजावणे, नाच करणे, वगैरे हलकी कृत्यें करताना दाखवत. साह-जिकपणेच हे प्रचारपट पाहणारांच्या मनात जर्मन सैनिकांचे श्रेष्ठत्व व देशप्रेम त्वरित ठसत असे. ' Baptism of Fire हा प्रचारपट यासाठी उत्कृष्ट उदाहरण म्हणून देता येईल.

प्रेक्षकांची जर्मनीच्या बाजूने नकळत सहानुभूती मिळविण्यासाठी याचप्रमाणे असंख्य युक्तिपूर्वक दृश्ये घातली जात. मोठमोठी धार्मिक व लोकांच्या आदरास पात्र अशी स्थळे दाखविली जात व जर्मन सैनिक जणू या पवित्र स्थळांचे रक्षण करण्यासाठी लढत आहेत, असा आभास संकलनाद्वारे निर्माण केला जाई. साहजिकच प्रेक्षकांची–विशेषत: धार्मिक वृत्तीच्या प्रेक्षकांची–जर्मनीबद्दल त्वरित आत्मीयता व आपुलकी निर्माण होई. याच वेळी कॉमेन्ट्री द्वारा सांगितले जाई– " Tomorrow the war will end, and. . . . . " लगेच मग लोकांचे संथ व आनंदी जीवन

दाखविणारी दृश्ये घुसडली जात. जणू त्यांना यांद्वारे असे सांगायचे की, उद्या युद्ध संपल्यावर तुम्हांला असेच संथ व निष्काळजी, आनंदी जीवन जगता येईल, असा आशावाद प्रेक्षकांच्या मनात रुजविला जाई. त्याला वाटावे जणू हे सर्व, लढणाऱ्या जर्मन सैनिकांमुळेच साध्य होणार आहे !

## परिश्रमांची सीमा

युद्धप्रचारपटांत वापरावयाचे प्रत्येक दृश्य, प्रत्येक शॉट हा अत्यंत काळजीपूर्वक निवडून योग्यरीत्या पडद्यावर दाखविण्यासाठी जर्मनीने खूप परिश्रम केले, आपल्या फिल्ममधून करावयाच्या प्रचारास पोषक शॉटस् निवडण्यासाठी त्यांनी बरीच मेंडोळी फिल्म वाया घालविली 'Baptism of Fire' या युद्धपटाची लांबी अवघी ६,५६० फूट होती. पण त्यासाठी जर्मनांनी २,३०,००० फूट न्यूजरील शॉटस् खर्च केले होते. हीच गोष्ट इतर प्रचारपटांबाबत लागू होती.

हे युद्धपट तयार करताना आईन्स्टाइनचा चित्रपट "Battleship Potemkin" च्या धर्तीवर चित्रपट तयार करण्यात यावेत असे गोबेल्सने त्याच्या चित्रपट अधिकाऱ्यांना सांगितले होते. तसेच वरील चित्रपट तंत्र आत्मसात करण्यासाठी त्यांना अनेकदा हा चित्रपट दाखविण्यात आला होता. ह्या तंत्रातच जर्मन सिनेतज्ज्ञांनी मानसिक दृष्टिकोनातून सुधारणा करून या युद्धप्रचारपटांना जन्म दिला होता. प्रचारपट काढण्याबाबत गोबेल्सने पूर्वीपासूनच अतीव काळजी घेतली होती. विचारपूर्वक केलेल्या प्रचाराद्वारे लोकांची मने आपल्याकडे वळविण्याची, जिंकण्याची दृष्टी त्याने कायम ठेवली होती. तो म्हणावयाचा , " Propaganda has to win the hearts of people and to keep it propaganda must not only content with forcing the Nazi system upon the people, it must endeavour to force the heart of the people into this syetem and to keep it there"

मृत्यू पाहणे अथवा प्रेते पाहणे, हे कोणालाच आवडत नाही, ही मानवी मनोवृत्ती पण जर्मन प्रचारपट तंत्रज्ञांनी हेरली होती. त्यामुळे त्यांच्या प्रचारपटांत मृत्यू अगर प्रेतांचे तसे फारच क्वचित दर्शन होई. आणि झालेच तर इतका थोडा वेळ की त्यामुळे पाहणाऱ्याच्या मनोवृत्तीवर निराशेचा पगडा बसू नये. मात्र उलट इतर राष्ट्रांच्या वृत्तप्रतिनिधींना मधूनमधून जे युद्धप्रचारपट दाखविण्यात येत त्यात मात्र मृत्यू–क्रूरता आदी युद्धाचे भयानक चित्र मुद्दाम त्यांच्या डोळ्यांपुढे उभे केले जाई. त्यांना घाबरविणे व त्यांच्या मनात युद्धाची भीती (Horrors) निर्माण करण्यासाठी हा सारा खटाटोप ! शिरर (SHIRER) म्हणतो, " हे चित्रपट पाहून या परदेशी वृत्तपत्रकारांनी त्याचे भीषण वर्णन त्यांच्या देशांतील वृत्तपत्रांत प्रसिद्ध करावे व त्यामुळे इतर देशांत घबराट उत्पन्न व्हावी, असा नाझी अधिकाऱ्यांचा यामागे उद्देश असे. मात्र आपल्या देशातील जनतेत घबराट उत्पन्न होऊ नये, म्हणून काळजी घेण्यास ते विसरले नव्हते. "

●

मराठी साहित्यविश्वात

नाविन्यपूर्ण ठरणारी....

मराठी चित्रपटसृष्टीत

खळबळ माजवणारी....

# हंसा वाडकर


यांची अपूर्व आत्मकथा—

## माणूस

दिवाळी अंकात

सादर होत आहे.

शिवाय—



## या अंकात

□ **दिल्लीतील मराठी नेतृत्वाचे अंतरंग**

श्री. यशवंतराव चव्हाण,
स. का. पाटील व स. गो. बर्वे
– दिल्लीतील या तीन बड्या
मराठी नेत्यांच्या सत्तास्पर्धेच्या
राजकारणाचे अंतरंगदर्शन

□ **कश्मीर : हिरवी स्वप्ने लाल छाया**

मेनन-सादिक यांच्या मुलाखती
व कश्मीर दौरा यांवर
आधारित खास पुरवणी–

□ **असे पती, असा पिता**

श्रीमती ललितादेवी यांनी
लाल बहादूर शास्त्री यांच्या-
संबंधी 'माणूस' कडे लिहून
पाठविलेल्या काही आठवणी

□ **आघाडीच्या लेखकांचे साहित्य**

गंगाधर गाडगीळ,
व. मो. पुरंदरे,
जयवंत दळवी,
द. मा. मिरासदार –

□ **पूर्वरंगातल्या रात्री**

आग्नेय आशियात पाच-पंचवीस
वेळा फेरफटका करून आलेले
तरुण मराठी छायाचित्रकार
विजय परुळकर यांनी आग्नेय
आशियातील रात्रजीवनाचे
घडवलेले सचित्र दर्शन.

**किंमत : एक रुपया पंचवीस पैसे फक्त**


● विक्री झालेल्या दर अंकामागे पंचवीस पैसे 'माणूस' प्रतिष्ठान तर्फे
दिवाळीच्या सुमुहूर्तावर सुरू होणाऱ्या ग्रामीण जलनिर्माण कार्याप्रित्यर्थ–

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H–649

प्रगतिपथावरील पुढचे पाऊल...

स्वस्तिक

चप्पल्स



स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लिमिटेड, खडकी, पुणें ३.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.